बुधवार, २४ नोव्हेंबर २०२१
♦ वर्ष १४ ♦ अंक १२७
www.ramprahar.com
# राम प्रहर
♦ पाने ६ ♦ किंमत ₹२ ♦ रायगड

## अंतरंग


ठाकरे सरकारने ओबीसींची फसवणूक थांबवावी -मुंडे/२
नेरळ मोहाचीवाडीतील महिलांची फेरीवाल्याकडून फसवणूक/४
न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिकेतून राहुल 'आऊट'/६


## माणगावमध्ये गावठी बॉम्बच्या स्फोटात एकाचा मृत्यू; दोघे जखमी



**माणगाव :** मच्छी व जंगली जनावरे मारण्यासाठी तयार करण्यात आलेले गावठी हातबॉम्ब हाताळत असताना त्याचा अचानक स्फोट होऊन एकाचा जागीच मृत्यू, तर त्याचा १० वर्षीय मुलगा गंभीर व पत्नी किरकोळ जखमी झाली आहे. ही घटना मंगळवारी (दि. २३) सकाळी माणगाव तालुक्यातील मशीदवाडी गावच्या हद्दीत शेतातील माळरानात धामणी नदीशेजारी घडली. संदेश चौहान (वय ४५) असे मयताचे नाव असून सत्यम संदेश चौहान (वय १०) व मजिनाबाई संदेश चौहान (वय ४०, सर्व रा. मूळ मध्य प्रदेश) जखमी झाले आहेत. यातील गंभीर मुलाला पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात हलविण्यात आले आहे. घटनास्थळापासून काही अंतरावर एका झाडावर लपवून ठेवलेले २५ गावठी हातबॉम्ब सापडले आहेत. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# रायगडात राष्ट्रवादीला मोठा धक्का

## जिल्हाध्यक्ष सुरेश लाड यांचा राजीनामा; आघाडीत घुसमट होत असल्याची भावना

**कर्जत : बातमीदार**

राज्यातील सत्ताधारी महाविकास आघाडी सरकारमधील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला रायगड जिल्ह्यात मोठा धक्का बसला आहे. रायगडमधील कर्जत विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरेश लाड यांनी आघाडीत आपली घुसमट होत असल्याचे सांगत जिल्हाध्यक्षपदाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा रायगड दौरा सुरू असतानाच लाड यांनी दिलेला राजीनामा राष्ट्रवादी काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जात आहे.



महाविकास आघाडीचे सरकार राज्यात सत्तेवर असताना आघाडीचा धर्म पाळण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, मात्र कर्जत-खालापूर तालुक्यात शिवसेना स्वबळाचा नारा देत आहे. अशा वेळी पक्षाचा निर्णय मान्य करणे आपल्यावर बंधनकारक असल्याने होणारी घुसमट तत्त्वांना पटणारी नाही आणि म्हणून असलेल्या पदावरून स्वतःहून दूर होत असल्याचे कर्जत येथे मंगळवारी (दि. २३) घेतलेल्या पत्रकार परिषदेत सुरेश लाड यांनी जाहीर केले. आपल्या पदाचा राजीनामा पक्षाच्या मुंबई येथील कार्यालयात कार्यकर्त्यामार्फत पोहचविला असल्याचेही त्यांनी सांगितले. (पान २ वर..)

### आमदार महेंद्र थोरवे यांना इशारा

सुरेश लाड यांनी जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देताना आपल्याला कोणतेही दुःख होत नसून आपण समाधानी आहे, मात्र माझ्या व्यवसायावर शिंतोडे उडविणाऱ्या मामा-भाचे यांचा व्यवसाय काय हे आता शोधून जनतेसमोर आणणार असल्याचे नाव न घेता सांगितले. त्यांचा रोख आमदार महेंद्र थोरवे यांच्यावर होता. त्यासाठी आपले काहीही झाले तरी त्याची किंमत मोजायला तयार असल्याचा निर्धारही लाड यांनी या वेळी व्यक्त केला.

### जिल्हा बँक निवडणूक

# देसाई, शिंदे यांचा पराभव

**सातारा, सांगली : प्रतिनिधी**

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत बड्या उमेदवारांचा पराभव झाला आहे. यामध्ये शिवसेना नेते व गृहराज्यमंत्री शंभुराज देसाई आणि राष्ट्रवादीचे नेते आमदार शशिकांत शिंदे यांचा समावेश आहे, तर सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत काँग्रेसचे आमदार तथा जिल्हाध्यक्ष विक्रम सावंत यांचा धक्कादायक पराभव झाला आहे.

सातारा जिल्हा बँकेच्या निवडणुकीत पाटण सोसायटी मतदारसंघात गृहराज्यमंत्री शंभूराज देसाई यांचा पराभव झाला. राष्ट्रवादीचे सत्यजित पाटणकर यांनी देसाई यांचा १४ मतांनी पराभव केला. पाटणकर यांना ५८, तर देसाई यांना ४४ मते मिळाली.



जावळी सोसायटी मतदारसंघात माजी मंत्री शशिकांत शिंदे राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार होते, मात्र पक्षाचेच बंडखोर उमेदवार ज्ञानदेव रांजणे यांनी त्यांचा पराभव केला. आमदार शिवेंद्रराजे समर्थक रांजणे यांना २५ मते, तर राष्ट्रवादीचे आमदार शिंदे यांना २४ मते मिळाली. अशा प्रकारे रांजणे यांनी शिंदे यांच्यावर केवळ एका मताने निसटता विजय मिळवला. शिंदेंच्या पराभवामुळे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशाला या ठिकाणी केराची टोपली दाखवण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

खटाव सोसायटी मतदारसंघातून बंडखोरी केलेले राष्ट्रवादीचे माजी आमदार प्रभाकर घार्गे कारागृहात असतानाही निवडून आले. (पान २ वर..)

# जनतेचे प्रश्न राज्य सरकारला दिसत नाहीत -आमदार प्रशांत ठाकूर

**धाटाव : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारमध्ये प्रत्येक जण स्वतःच्या पक्षाचा करता विचार करून आपले अस्तित्व टिकवण्याचा केविलवाणा प्रयत्न करताना दिसत आहेत. त्याचा प्रत्यय रायगडवासीयांना माणगाव येथील एका मंत्रीमहोदयांच्या कार्यक्रमातून आला. एकीकडे सत्तेत राहायचे आणि दुसरीकडे एकमेकांवर आरोप करायचे अशी परिस्थिती असल्याने सामान्य लोकांचे प्रश्न यांच्या सरकारला दिसत नाहीत. गेल्या दीड वर्षापासून मंत्रालयात आजाराने ग्रस्त असलेल्या राज्य सरकारला जनतेच्या समस्या कळणार कशा, अशी टीका भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथे केली.

## नागोठण्यात भाजप जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

नागोठणे येथे भारतीय जनता पक्ष रोहा मंडल अंतर्गत जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन सोमवारी (दि. २२) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

उद्घाटन समारंभास भाजप दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष अ‍ॅड. महेश मोहिते, उपाध्यक्ष राजेश मपारा, ज्येष्ठ नेते संजय कोनकर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित घाग, जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, अविनाश कोळी, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष हेमा



मानकर, उपाध्यक्ष श्रेया कुंटे, आदिवासी मोर्चा जिल्हाध्यक्ष नामदेव वाघमारे, तालुका सरचिटणीस आनंद लाड, शिक्षण सेल तालुका अध्यक्ष अशोक अहिरे, सोशल मीडिया संयोजक श्वेता ताडफळे, कामगार आघाडी रोहा तालुका अध्यक्ष विलास डाके, विष्णू मोरे, मारुती शिंदे, शुभांश पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, केंद्रात व राज्यात भाजपची सत्ता होती तेव्हा आपण समतोल साधण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला. दुर्दैवाने राज्यातील समतोल आता हरवला आहे. त्यामुळे जनतेच्या इच्छेविरोधात लोकांवर वेगवेगळ्या पद्धतीचे प्रकल्प लादण्याचा प्रयत्न केला जात आहे आणि त्यातून वेगवेगळी आंदोलने आपल्याला पाहायला मिळत आहेत. राज्यात जनतेविरुद्ध प्रकल्प लादल्याने जनतेच्या मनात प्रचंड रोष निर्माण झालेला आहे. लोकांची लोकशाही मार्गाने सुरू असलेली आंदोलने चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. सध्याच्या एसटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनात कशा पद्धतीने फुट पडेल याचे नवे नवे प्रयोग केले जात आहेत. वेळप्रसंगी त्यांना अडवले, धमकावले जात आहे. अशा परिस्थितीत सामान्य नागरिक, शेतकऱ्यांसह अन्यायग्रस्त घटकांना न्याय देण्यासाठी भाजपची आग्रही भूमिका राहील. (पान २ वर..)

## निवडक

### फंगसच्या नव्या स्ट्रेनने दिल्लीत दोघांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** देशभरात कोरोना विषाणूच्या दुसऱ्या लाटेचा प्रभाव कमी होत असताना आता फंगसच्या नव्या स्ट्रेनने एन्ट्री केली आहे. दिल्ली 'एम्स'मध्ये डॉक्टरांनी क्रोनिक ऑब्स्ट्रक्टिव पलमनरी डिजिज (सीओपीडी) पीडित दोन रुग्णांमध्ये एस्परगिलस लेंटुलस झाल्याची पुष्टी केली आहे. नव्या स्ट्रेनने संक्रमित दोन्ही रुग्णांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

### लोकल प्रवाशांना आजपासून यूटीएस ॲपवरही तिकिट

**मुंबई :** लोकलने प्रवास करणाऱ्या मुंबईकरांना रेल्वे प्रशासनाने मोठा दिलासा आहे. मोबाइल यूटीएस ॲप सामान्य नागरिकांसाठी सुरू करण्यात येणार आहे. कोरोना काळात रेल्वे प्रवासावर निर्बंध लागू करण्यात आले होते. त्यानंतर यूटीएस ॲपवरून तिकीट बुकिंग बंद करण्यात आले होते. ही पद्धती बुधवार (दि. २४)पासून पुन्हा सुरू होणार आहे. त्यामुळे यूटीएस ॲपमधून तिकीट घेताना संबंधित प्रवाशाचे लसीकरण झाले असल्याची खातरजमा होणार आहे.

# चिंध्रणमध्ये विविध विकासकामांचा शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस सोमवारी उत्साहात साजरा झाला. याचेच औचित्य साधून चिंध्रण येथे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधीतून तयार झालेल्या काँक्रिट रस्त्याचे आणि चिंध्रण ग्रामपंचायतीमार्फत झालेल्या गटारांच्या कामाचे उद्घाटन, तसेच स्मशानभूमीच्या कामाचे भूमिपूजन मंगळवारी (दि. २३) झाले. या कामांचा शुभारंभ अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाला.

या कार्यक्रमास भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भाजप नेते एकनाथ देशेकर, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, ओबीसी सेल तालुका अध्यक्ष आप्पा भागीत, नामदेव जमदाडे, नरेश पाटील, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, कैलास मढवी, अंकुश पाटील, शिवाजी दुर्गे, सागर भोईर, रवींद्र पाटील, लक्ष्मण कडू, सरपंच कमला देशेकर, उपसरपंच इंदिरा पाटील, अनंता कडू, भगवान कडू, राजेंद्र पाटील, हरिश्चंद्र पाटील, माजी सरपंच मंदा देशेकर, बाळकृष्ण पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी ग्रामपंचायत कार्यालयात अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला, तसेच शांतीवन येथे रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन त्यांच्या उपस्थितीत झाले.

## एसटी कर्मचारी आणि सरकारमध्ये बैठक


**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात गेल्या महिनाभरापासून सुरू असलेला एसटी कर्मचारी संप आता लवकरच मिटण्याची चिन्ह निर्माण झाली आहेत. संपावर तोडगा काढण्यासाठी मंगळवारी (दि. २३) सह्याद्री अतिथीगृहावर परिवहनमंत्री अनिल परब, आमदार सदाभाऊ खोत, गोपीचंद पडळकर यांच्यासोबत एसटी कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींची महत्त्वपूर्ण बैठक झाली.

या बैठकीत राज्य शासनाकडून कामगारांना एक पर्याय दिला असून त्यावर बुधवारी (दि. २४) सकाळी ११ वाजता पुन्हा एकदा चर्चा होणार आहे, अशी माहिती परिवहनमंत्री परब यांनी बैठकीनंतर दिली.

दिवाळीच्याही आधीपासून एसटी कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उपसले आहे. एसटी महामंडळाचे शासनात विलीनीकरण करण्यात यावे, अशी संपकऱ्यांची प्रमुख मागणी आहे.


## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी



### पनवेल महानगरपालिका हद्दीत
### बुधवार, दि. २४ नोव्हेंबर २०२१ रोजी होणारे
# कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
१२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१५ न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
१६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

### कोव्हॅक्सिन

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

### पनवेल ग्रामीण लसीकरण

- वळवली रा.जि.प. शाळा
- रोहिंजण रा.जि.प. शाळा
- मुर्बी रा.जि.प. शाळा
- कोयनावेळे रा.जि.प. शाळा
- पाले खुर्द रा.जि.प. शाळा
- पेंधर रा.जि.प. शाळा
- तळोजे मजकूर रा.जि.प. शाळा
- कळंबोली काळभैरव मंदिर सभागृह
- आसुडगाव रा.जि.प. शाळा
- जुई रा.जि.प. शाळा


# 'अंगारकी'निमित्त बाप्पाची मंदिरे भाविकांनी फुलली!

## दिवेआगरमध्ये सुवर्णगणेशाची पुन:प्रतिष्ठापना



**अलिबाग : प्रतिनिधी**

सुखकर्ता, दुःखहर्ता गणरायाच्या अंगारक चतुर्थीनिमित्त जिल्ह्यातील गणेश मंदिरे मंगळवारी (दि. २३) भाविकांनी फुलली होती. कोरोनानंतर प्रथमच आलेला अंगारक योग साधून भक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे मनोभावे दर्शन घेतले. दरम्यान, दिवेआगर येथील सुवर्णगणेशाची पुनःप्रतिष्ठापनाही भक्तिभावाने करण्यात आली.

कोरोना महामारीमुळे गेले दीड वर्ष मंदिरे बंद होती. त्यामुळे भाविकांना देव-देवतांचे बाहेरून दर्शन घ्यावे लागत होते. अखेर मंदिरे उघडली. त्यानंतर आलेल्या अंगारक चतुर्थीला भाविकांचा उत्साह दिसून आला.

अंगारक चतुर्थीचे औचित्य साधून श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर येथील सुवर्णगणेशाची उपमुख्यमंत्री अजित पवार व त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्या हस्ते पुनःप्रतिष्ठापना करण्यात आली. या कार्यक्रमाला लोकप्रतिनिधी, अधिकारी, नागरिक उपस्थित होते.

## अभिनंदन!



**पनवेल : महानगरपालिकेने स्वच्छ सर्वेक्षण २०२१ अंतर्गत पुरस्कार मिळवून बाजी मारली आहे. याबद्दल शाश्वत फाऊंडेशन, भाजप महापालिका कोअर कमिटी आणि खारघर मंडलतर्फे महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, तसेच आयुक्त गणेश देशमुख यांचे अभिनंदन करण्यात आले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक प्रवीण पाटील, शाश्वत फाऊंडेशनच्या अध्यक्ष व भाजप खारघर मंडल उपाध्यक्ष बीना गोगरी, सचिव अंजुबेन आर्या, कार्याध्यक्ष स्मिता आचार्य, भाग्यश्री आर्यमाने आदी उपस्थित होते.**

# ठाकरे सरकारने ओबीसींची फसवणूक थांबवावी

## भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील ओबीसींचे राजकीय आरक्षण केवळ ठाकरे सरकारमुळे गमावले असून हे आरक्षण पुन्हा टिकाऊ स्वरूपात मिळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एंपिरिकल डेटा गोळा करण्याचा उपाय ठाकरे सरकार करत नाही. ठाकरे सरकारने ओबीसींची फसवणूक थांबवावी आणि राज्य मागासवर्ग आयोगाला ओबीसींचा एंपिरिकल डेटा गोळा करण्यासाठी आवश्यक साडेचारशे कोटी रुपयांची मदत करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी मंगळवारी (दि. २३) केली. भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. आमदार राहुल नार्वेकर सोबत होते. या वेळी पंकजा मुंडे यांनी गेल्या दोन वर्षातील ठाकरे सरकारने ओबीसींची, तसेच अन्य समाजघटकांची कशी फसवणूक केली आहे हे विस्ताराने स्पष्ट केले.

मुंडे यांनी सांगितले की, ठाकरे सरकारने अध्यादेश काढून ओबीसींचे आरक्षण लागू करण्याचा प्रयत्न केला आहे, पण तो अध्यादेश सर्वोच्च न्यायालयाची अट पूर्ण करणारा नाही. राज्य निवडणूक आयोगानेही नुकतीच ८६ नगरपालिकांमध्ये अध्यादेशाच्या आधारे ओबीसींच्या आरक्षणाची सोडत जाहीर केली, पण त्यात स्पष्ट म्हटले आहे की या अध्यादेशाला उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान देण्यात आले असून आयोगातर्फे करण्यात येणारी सर्व कार्यवाही उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून असेल. अर्थात ओबीसींवरील टांगती तलवार कायमच राहिली आहे. फेब्रुवारीमध्ये राज्यातील ८५ टक्के स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. ठाकरे सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ओबीसींसाठी पक्के आरक्षण दिले नाही, तर समाजाला राजकीय आरक्षणाच्या मोठ्या संधीला मुकावे लागण्याचा धोका आहे.

पुढे त्या म्हणाल्या की, ओबीसींचे राजकीय आरक्षण टिकविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने १३ डिसेंबर २०१९ रोजी सांगितले होते की, राज्य मागासवर्ग आयोग स्थापन करून एंपिरिकल डेटा गोळा करावा.

ठाकरे सरकारने हा आदेश वेळीच पाळला असता, तर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचले असते, पण ठाकरे सरकारने १५ महिन्यांमध्ये कोर्टाच्या सात तारखांमध्ये केवळ वेळकाढूपणा केला आणि अखेरीस मार्च २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हे आरक्षण रद्द केले. केवळ महाराष्ट्र राज्यातच ओबीसींचे राजकीय आरक्षण रद्द झाले आहे.

ओबीसींना टिकावू स्वरूपात राजकीय आरक्षण पुन्हा मिळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने सांगितल्याप्रमाणे राज्य मागासवर्ग आयोगामार्फत एंपिरिकल डेटा गोळा केला पाहिजे, पण त्यासाठी ठाकरे सरकार मागासवर्ग आयोगाला निधी पुरवत नाही.

आरक्षण रद्द झाल्यानंतर लगेचच मार्च महिन्यात हे काम हाती घेतले असते, तर आतापर्यंत काम पूर्ण झाले असते, असेही त्यांनी सांगितले. ठाकरे सरकारचा ओबीसींकडे पाहण्याचा दृष्टिकोन उदासीन आहे. फडणवीस सरकारने ओबीसींसाठी सुरू केलेल्या महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणी या सरकारने रोखली आहे. एकूणच ठाकरे सरकारने दोन वर्षांत ओबीसींची फसवणूक केली आहे.



पनवेल : शुभदा रमेश पोटले संपादित दि म्हसळा टाइम्स दिवाळी अंकाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी प्रकाशन झाले. या वेळी दि म्हसळा टाइम्सचे संस्थापक रमेश पोटले, सुप्रसिद्ध गजलकार अे. के. शेख, सुरेंद्र हनुमंते, विक्रम येलवे आदी उपस्थित होते.

## अमरावतीच्या घटनेचा भाजपतर्फे कोल्हापुरात निषेध

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

त्रिपुरात कोणतीही अनुचित घटना घडली नसताना मशिदीची नासधूस झाल्याची व्हिडीओ व्हायरल करून मालेगाव, अमरावती व नांदेड येथे नुकत्याच दंगली झाल्या. १५ हजार ते ४० हजार लोकांचे जमाव रस्त्यावर उतरून दुकाने, कार्यालये, गाड्या यांचा विद्ध्वंस केला गेला. याचा भाजपच्या वतीने कोल्हापूर येथे तीव्र निषेध करण्यात आला. प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी (दि. २३) शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी यांना भेटून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना द्यावयाचे निवेदन दिले.

## ओबीसी जनजागरण रथयात्रेचा आकुर्लीत समारोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ओबीसी जागर अभियानांतर्गत भाजप उत्तर रायगड ओबीसी मोर्चातर्फे जनजागरण रथयात्रेचे आयोजन पनवेल तालुक्यात करण्यात आले होते. तीन दिवस ही जनजागर रथयात्रा सुरू असून, मंगळवारी (दि. २३) चिंध्रण, महाळुंगी वाकडी या ठिकाणी रथयात्र मार्गक्रमण करत आकुर्ली येथे या यात्रेचा भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप झाला.



ओबीसींच्या राजकीय आरक्षणासंदर्भात इम्पिरिकल डेटा गोळा करण्यासाठी ठाकरे सरकार जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत आहे. सरकारने केवळ तात्पुरता अध्यादेश काढून ओबीसी समाजाची दिशाभूल चालवली आहे. हे सरकार ओबीसी समाजाबाबत उदासीन आहे. ओबीसी समाजाला गृहित धरले जात आहे. या वेळी जर ओबीसी समाज एकत्र आला नाही, तर ओबीसींचे राजकीय अस्तित्व संपून जाईल आणि सामाजिक अस्तित्वदेखील धोक्यात येईल. त्यामुळे ओबीसी समाजाने एकत्र यावे यासाठी हे अभियान राबवले जात आहे. यानुसार रविवारी पनवलमध्ये या जनजागर रथ यात्रेला सुरुवात झाली. संपूर्ण तालुक्यात तीन दिवस मार्गक्रमण करत मंगळवारी आकुर्ली येथे या रथयात्रेचा समारोप झाला.

या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, पनवेल पंचायत समिती सदस्य भुपेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, ओबीसी सेल तालुका अध्यक्ष अप्पा भागीत, शिवाजी दुर्गे, युवामोर्चा तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, चिंध्रण ग्रामपंचायत सरपंच कमला देशेकर आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## स्वच्छ सर्वेक्षण अंर्तगत सुशोभीकरणाची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्वच्छ सर्वेक्षण अंर्तगत महापालिका प्रभाग ८५, ८६मध्ये रंगरंगोटी, स्वच्छता, तसेच नागरी समस्या निवारण करण्याची मागणी माजी नगरसेविका सुजाता पाटील यांनी आयुक्तांकडे केली आहे.

नवी मुंबई मनपा प्रभाग ८५ व ८६मधील नेरूळ सेक्टर ६, सारसोळे गाव आणि कुकशेत गाव या परिसराचा समावेश होत आहे. स्वच्छ सर्वेक्षण अंर्तगत अभियान राबविताना प्रथम प्रभाग ८५ व ८६मधील गटारांची तळापासून स्वच्छता करून चोरीला गेलेली अथवा तुटलेली झाकणे असतील तिथे नवीन बसवावीत, मलःनिस्सारण वाहिन्यांची डागडुजी करावी, प्रभागातील मुख्य तसेच अंतर्गत रस्त्यावरील सिडको, खाजगी तसेच ग्रामस्थांच्या इमारती, चाळी, इतर गृहनिर्माण सोसायट्यांच्या संरक्षक भिंतीची रंगरंगोटी करून त्यावर स्वच्छतेविषयी, तसेच आरोग्य विषयक सुभाषिते व प्रबोधनात्मक सुविचार टाकण्यात यावे आदी मागण्या आहेत.

## रोटरी क्लबतर्फे मोफत आरोग्य तपासणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या वतीने बालाजी सिम्फानी या इमारतीच्या आवारात रविवारी (दि. २१) आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. डॉ. गिरीश गुणे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात 'एक चमच कम, चार कदम आगे' म्हणजे साखर, मीठ व तेल यांचा आपल्या रोजच्या आहारातील एक चमचा कमी करून रोजच्या चालण्यात चार पावले अधिक वाढवा, असे सांगण्यात आले. हे केल्याने आरोग्य सुदृढ व निरोगी राहील, असे डॉ. गुणे यांनी आपल्या मार्गदर्शनात नमूद करून शिबिर आयोजनाचे महत्त्व सांगितले.



या शिबिरात मधुमेह, रक्तदाब, संधिवात, ईसीजी, बॉडी मास इंडेक्स या प्रकारे मोफत तपासणी करून सर्व रुग्णांचे समुपदेशन करण्यात आले. शिबिर आयोजनात रोटरी क्लबच्या आरोग्य संचालिका सायली सातवळेकर यांनी पुढाकार घेऊन सर्व रोटरी सदस्यांसह हे शिबिर यशस्वी केले.

या वेळी डॉ. गिरीश गुणे यांच्यासह क्लब अध्यक्ष डॉ. अभय गुरसाळे, डॉ. संजीवनी गुणे, डॉ. सी. डी. कुलकर्णी, डॉ. संतोष जाधव, डॉ. हेमंत इंगळे, डॉ. लक्ष्मण आवटे, डॉ. राजेश गांधी, डॉ. जया गुरसाळे, डॉ. मिलिंद घरत, डॉ. रोहिणी घरत आदी तज्ज्ञ डॉक्टरांनी सर्व रुग्णांची तपासणी केली. रोटरी क्लबच्या पदाधिकारी, सदस्यांचे, तसेच बालाजी सिम्फानी सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य या वेळी मिळाले. या शिबिराचा १९६ रुग्णांनी लाभ घेतला.

## दागिनेचोर मुद्देमालासह गजाआड

**उरण : प्रतिनिधी**

जबरी चोरी व गुन्ह्यातील आरोपी यांच्या मुसक्या आवळून न्हावाशेवा पोलिसांकडून आरोपींनी गुन्ह्यात चोरी केलेले सोन्याचे दागिने व लगड शिताफीने हस्तगत केली आहे.



पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या वृत्तानुसार न्हावाशेवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गव्हाण येथील तक्रारदार यांच्या घराच्या उघड्या दरवाजातून घरामध्ये प्रवेश करून ३८.४० तोळे सोन्याचे दागिने चोरी केले. याबाबतची तक्रार फिर्यादीने पोलीस ठाण्यात दाखल केली होती.

या गुन्ह्याचा कसोशीने तपास करून तक्रारदार यांच्या मुलीचा उरण तालुक्यातील मोरा कोएसो इंग्लिश स्कूलजवळ राहणारा मित्र याच्यावर संशय आला. त्याला शिताफीने ताब्यात घेऊन तपास केला असता, फिर्यादी यांची मुलगी (रा. गव्हाण) हिने मदत केली असल्याचे आरोपीने सांगितले. तिलाही या गुन्ह्यात अटक करण्यात आली. या गुन्ह्यातील आरोपींनी चोरी केलेले सोन्याचे दागिने हे वेगवेगळ्या ज्वेलर्सकडे विक्री केल्याचे उघड झाल्याने संबंधित ज्वेलर्स यांना तपासकामी बोलावून सखोल चौकशी केली.

याशिवाय न्हावाशेवा पोलीस ठाण्यातील भा.दं.वि. कलम ३९२, ३४ या गुन्ह्यातील फिर्यादी हे दुपारी भाजीपाला आणण्यासाठी डेली मार्ट सेक्टर १७ या ठिकाणी गेले. तेथून किराणा, भाजीपाला घेऊन रिक्षाने पुन्हा त्यांच्या घरी ठाकूर रेसिडेंसीच्या कंपाऊंटमध्ये येऊन समान घेऊन लिफ्टमध्ये ठेवत असताना अनोळखी इसमाने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन जबरदस्तीने खेचली. त्यानंतर सोसायटीच्या कंपाऊंटमध्ये उभे असलेल्या काळ्या रंगाच्या पल्सर मोटारसायकलीवरून फरार झाल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्यात अथक प्रयत्न करून घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून चोरीस गेलेली सोनसाखळी मोडून तयार केलेली एक लाख १२ हजार रुपयांची एक ३५.२२० ग्रॅम वजनाची लगड न्हावाशेवा पोलिसांनी जप्त केली आहे. दोन्ही गुन्ह्यांमध्ये पोलिसांनी एकूण ४१९.२२ ग्रॅम सोन्याचे दागिने व लगड जप्त केली आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## नाच गं घुमातर्फे नांदिवडेत 'संतांची मांदियाळी'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या नाच गं घुमा संस्थेच्या वतीने 'संतांची मांदियाळी' हा कार्यक्रम रत्नागिरी जिल्ह्यातील नांदिवडे या गावात सादर करण्यात आला. संत परंपरा, त्यांचे कार्य, समाजाला दिलेले ज्ञान याचे विवेचन यामध्ये करण्यात आले होते. अभंग, भारूड, ओव्या, गवळण, दिंडी, विठ्ठल नामाचा गजर यांनी या कार्यक्रमाला वेगळीच उंची प्राप्त झाली.

नांदिवडे या गावात त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त लक्ष्मीनारायणाचा उत्सव साजरा झाला. कोकणातील परंपरेनुसार नाटक, गायन आदी दरवर्षी सादर केले जाते. यंदाच्या वर्षी नाच गं घुमा या संस्थेला कला सादर करण्याचा मान मिळाला. संत



ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, निवृत्तीनाथ, गोरा कुंभार, मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा यांच्यासह विठ्ठल–रुक्मिणी राम–सीता यांच्या भूमिका साकारल्या होत्या. महाराष्ट्रातील परंपरा, संस्कृती जपण्याचे कार्य यानिमित्ताने केले गेले.

या कार्यक्रमाचे दिग्दर्शन शरद दातार यांनी केले, तर संकल्पना, लेखन, संकलन व निवेदन नाच गं घुमाच्या अध्यक्ष सुनीता खरे यांनी केले. विशेष म्हणजे संतांच्या भूमिका सर्व महिला कलाकारांनी केल्या.


| रायगड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अलिबाग–रायगड. जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, दुसरा मजला, हिराकोट तलावाजवळ, अलिबाग, जिल्हा :– रायगड ४०२ २०१. कार्यालय फो.नं. ०२१४१/२२४२२५ | सत्यमेव जयते | RAIGAD DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL FORUM, RAIGAD ALIBAG. COLLECTOR OFFICE BUILDING, 2nd FLOOR, NEAR HIRACOTE TALAV, ALIBAG, DIST-RAIGAD 402201 Office Tel. No. 02141/224225 |
|---|---|---|
| E-MAIL ID :- confo-rg-mh@nic.in | | Website :- www.confonet.nic.in |
| जा.क्र.जिग्रातनिआ/राय/२१/३६१७ | | दिनांक :– १७/११/२०२१ |

दरखास्तदाराचे वकील
श्री. वैभव बा. मयेकर

**जाहीर नोटीस**

**अलिबाग येथील मे. रायगड जिल्हा ग्राहक तकार निवारण आयोगासमोर**

जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, दुसरा मजला, हिराकोट तलावाजवळ, अलिबाग, जिल्हा–रायगड ४०२२०१

दरखास्त क्रमांक : ५९/२०२१ ते ८४/२०२१

श्री. सुजित म. गुरव (दरखास्त क्र. ५९/२०१८)
सौ. सुप्रिया न. चिंचकर (दरखास्त क्र. ६०/२०२१)
श्री. उमेश शं. कांबळे (दरखास्त क्र. ६१/२०२१)
श्री. संदिप तु. थोपटे (दरखास्त क्र. ६२/२०२१)
श्री. जिजाबा ध. कचरे (दरखास्त क्र. ६३/२०२१)
श्री. नितेश म. पुनकर (दरखास्त क्र. ६४/२०२१)
श्री. संजय आ. माळवदकर (दरखास्त क्र. ६५/२०२१)
श्री. मनोज य. देवरे (दरखास्त क्र. ६६/२०२१)
श्री. गजानन वा. लाहुडकर (दरखास्त क्र. ६७/२०२१)
श्री. ज्ञानदेव गे. उत्तेकर (दरखास्त क्र. ६८/२०२१)
श्री. रुपेश ग. भायदे (दरखास्त क्र. ६९/२०२१)
श्री. नितीन म. कायरकर (दरखास्त क्र. ७०/२०२१) दरखास्तदार
सौ. सविता अ. आव्हाड (दरखास्त क्र. ७१/२०२१)
श्री. राजेश पां. तायडे (दरखास्त क्र. ७२/२०२१)
श्री. किसन रा. धुमाळ (दरखास्त क्र. ७३/२०२१)
श्री. तुषार भा. गुंड (दरखास्त क्र. ७४/२०२१)
सौ. उर्मिला ज्ञा. मंडलिक (दरखास्त क्र. ७५/२०२१)
श्री. बबन ध. आटपाडकर (दरखास्त क्र. ७६/२०२१)
श्री. अमोल आ. धनावडे (दरखास्त क्र. ७७/२०२१)
श्री. नथुराम द. पाखुर्डे (दरखास्त क्र. ७८/२०२१)
श्री. रमेश धों. वाघचौरे (दरखास्त क्र. ७९/२०२१)
श्री. संजय म. गुरव (दरखास्त क्र. ८०/२०२१)
श्री. संजय पां. पालकर (दरखास्त क्र. ८१/२०२१)
श्री. सुशील स. पाटील (दरखास्त क्र. ८२/२०२१)
श्री. पांडुरंग शि. पाटील (दरखास्त क्र. ८३/२०२१)
श्री. विजय वि. गुरव (दरखास्त क्र. ८४/२०२१)

विरूद्ध

२) उषा चुण्णीलाल गुप्ता.
ऑफीस :– शॉप नं. २६, आदिशक्ती को. ऑप. हौसिंग.
सोसा. मर्या., सेक्टर १७, कर्नाळा बँकेमागे,
नवीन पनवेल, (पूर्व), पनवेल–रायगड ४१०२०६

**जाहीर प्रकटन**

वर नमूद दरखास्तदार यांनी सामनेवाले यांच्या विरुद्ध ग्राहक संरक्षण कायदा २०१९ कलम ७१ अन्वये दरखास्त दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता स्विकारत नाहीत/पत्ता बदलला/मिळून येत नाही. म्हणून या जाहीर समन्स/नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

विरुद्ध पक्ष यांनी वर नमूद पत्त्यावर दि. २८/१२/२०२१ रोजी सकाळी ११:०० वाजता वेळेत स्वतः अगर तर्फे प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्ष हे हजर न राहिलेस ग्राहक तक्रार आयोगाचा एकतर्फा आदेश पारित करणेत येऊन पुढील आदेश करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मे. अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड–अलिबाग यांचे आदेशानुसार

**सही/–**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच करिता**
**रायगड अलिबाग**

**ठिकाण :– अलिबाग–रायगड**
**दि. १७/११/२०२१**

शिक्का


पान १ वरून

## रायगडात राष्ट्रवादीला मोठा धक्का

लाड पुढे म्हणाले की, राज्यात तीन पक्षांचे आघाडी सरकार असताना स्थानिक आमदार स्वतःच्या पक्षाचे निवडणूक चिन्ह लावून विकासकामांची भूमिपूजने करतात. प्रशासकीय भवनाच्या मंजुरीसाठी आपण प्रयत्न केले होते. तरीही भूमिपूजन समारंभाला आपल्याला न बोलावण्याचा आदेश स्थानिक आमदारांनी अधिकाऱ्यांना दिला. त्यानंतर आपण तेथे जाऊन आपल्या भावना व्यक्त केल्या, मात्र शिवसेनावाल्यांनी मलाच लक्ष्य केले. याबाबत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना कळविले, पण वरिष्ठांकडून तक्रारींवर लक्ष दिले जात नव्हते. सातत्याने आघाडीचा धर्म पाळण्याचे आदेश दिले जात होते. शिवसेनेच्या आमदाराला रान मोकळे सोडले जात असल्याने पक्षाच्या जोखडात अडकून पडण्यापेक्षा काम करण्याचे स्वातंत्र्य मिळावे यासाठी पक्षाचे जिल्हाध्यक्षपद मी सोडत आहे.

## देसाई, शिंदे यांचा पराभव

सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत जतमध्ये काँग्रेसचे आमदार आणि सांगली जिल्हाध्यक्ष विक्रम सावंत यांचा धक्कादायक पराभव झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आणि ऐनवेळी निवडणुकीत भाजपची उमेदवारी घेणारे प्रकाश जमदाडे यांनी आमदार सावंत यांना पराभवाची धूळ चारली. सावंत हे कृषिराज्यमंत्री विश्वजीत कदम यांचे मामा आहेत. त्यामुळे काँग्रेसचा या ठिकाणी 'योग्य कार्यक्रम' करण्यात आल्याची जोरदार चर्चा स्थानिक स्तरावर सुरू आहे.

दरम्यान, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत बँक–पतसंस्था गटात भाजपच्या शेतकरी विकास पॅनेलच्या राहुल महाडिक यांनी महाविकास आघाडीला धक्का दिला आहे. त्यांनी राष्ट्रवादीचे नेते किरण लाड यांचा पराभव करीत बँकेत एण्ट्री केली आहे.

**राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून पक्ष कार्यालयावर दगडफेक**

सातारा येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार शशिकांत शिंदे यांचा धक्कादायक पराभव झाला. या निवडणुकीमध्ये जावळी सोसायटी मतदारसंघातून माजी मंत्री शिंदे अवघ्या एका मताने पराभूत झाले. त्यामुळे त्यांच्या समर्थकांनी संतापाच्या भरात आपल्याच पक्षाच्या कार्यालयावर दगडफेक केली. त्यामुळे साताऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेसमधील धुसफूस पुन्हा एकदा समोर आली आहे. यामुळे येत्या काळात राष्ट्रवादी अंतर्गत संघर्ष पेटण्याचीही चिन्हे आहेत.

## जनतेचे प्रश्न राज्य सरकारला दिसत नाही –आमदार प्रशांत ठाकूर

महाराष्ट्रात चक्रीवादळ ते कोरोना काळात भारतीय जनता पक्षाने विशेष योगदान दिलेले आहे. खासकरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरीब जनतेला मोफत धान्य, गॅस, महिलांना अर्थिक मदत, तसेच मोठ्या प्रमाणावर लसीचा साठा महाराष्ट्राला दिला. राज्यात जेव्हा चक्रीवादळ आले होते तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकसानग्रस्त भागात प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली व विशेष पॅकेज दिले. त्यामुळे जनतेला न्याय कोणी दिला असेल, तर तो भाजपने दिला आहे. दुसरीकडे महाविकास आघाडी सरकार पूर्णतः अपयशी ठरल्याचे दिसून येते, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

नागोठण्यातील जनसंपर्क कार्यालयाद्वारे येथील लोकांसाठी भाजपने एक नवीन दालन खुले करून दिले असून त्याचा परिसरातील लोकांना निश्चितच फायदा होणार आहे. भाजपचे हे जनसंपर्क कार्यालय सर्वांसाठी आधार ठरेल, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

आपले प्रश्न सोडविण्याचे हक्काचे व्यासपीठ या कार्यालयामार्फत जनतेला मिळाले असल्याचे भाजप दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष अ‍ॅड. महेश मोहिते यांनी सांगितले, तर तरुण–बेरोजगारांना नोकरी व महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर व अन्य नेत्यांनी मला सहकार्य करावे, अशी विनंती प्रास्ताविकात रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर यांनी केली.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून रोहा तालुका भाजपच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर व कर्मचारी यांचा कोविड योद्धा म्हणून सत्कार, तसेच पर्यावरण रक्षक पंधरवड्यानिमित्त घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

# कोळी बांधवांसमोर नवे संकट

## मासळीऐवजी जाळ्यात जेली फिश

**उरण : रामप्रहर वृत्त**

सुमद्रातील वादळ शांत झाल्यानंतर आता कुठे खोल समुद्रात मासेमारी सुरू झाली आहे, मात्र मच्छीमारांसमोर नवे संकट उभे राहिले आहे. जाळ्यात मासळीपेक्षा जेली फिशच अधिक अडकत असल्याने त्यांचे मोठे नुकसान होत आहे. तसेच हे विषारी असल्याने खलाशांनाही बाधा होण्याचा धोका निर्माण झाला आहे. जाळ्यांचेही नुकसान होत असल्याची व्यथा उरणमधील मच्छीमारांनी व्यक्त केली.



गेले वर्ष कोरोनामुळे वाया गेले. त्यानंतर दोन महिन्यांची पावसाळी बंदी आणि नंतर वारंवार वातावरणात झालेल्या बदलांमुळे मासेमारी करता आली नाही. त्यामुळे मच्छीमार कोळी बांधव आर्थिक संकटात आहे. त्यात हे नवे संकट आल्याची माहिती करंजा येथील मच्छीमार विनायक पाटील यांनी दिली.

मध्यम आणि मोठ्या मच्छीमार बोटीतून मासेमारी करण्यास एका फेरीसाठी डिझेल, बर्फ, तसेच इतर कामांसाठी दोन ते पाच लाख रुपयांचा खर्च करावा लागतो. त्याकरिता किमान चार दिवस लागतात. यासाठी होणारा खर्च हा



सध्या मासळीपेक्षा अधिक प्रमाणात मिळत असलेल्या जेली फिशमुळे वाया जात आहे. मासळी एक ते दोन टन व जेली फिश चार ते पाच टन मिळत असल्याचे पाटील यांनी सांगितले. त्यामुळे मच्छीमारांची फेरी वाया जात आहे.

जेली फिशच्या अतिवजनामुळे जाळ्यांचे मोठे नुकसान होत आहे. याचाही फटका मच्छीमारांना बसत आहे. सापडलेल्या मासळीतून जेली फिश वेगळे करावे लागत आहेत. त्यांचे विषारी काटे खलाशांना लागण्याचा धोका वाढल्याचे नित्यानंद कोळी यांनी सांगितले. अशा प्रकारच्या संकटाचा सामना करीत सध्या मच्छीमार कोळी बांधव मासेमारी करीत असल्याने शासनाने याची दखल घ्यावी, अशी मागणीही कोळी यांनी केली.

**■ प्रमाण वाढल्याने नागरिकांनाही धोका**

***जेली फिश किनाऱ्यावर आल्याने नागरिकांसमोर यापूर्वीही अनेकदा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. आताही समुद्रातील वाढते प्रमाण पाहता जेली फिश किनाऱ्यावर येण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे येथील मच्छीमारांनी सांगितले.***

# रायगड जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**पनवेल : वार्ताहर**

करोनाच्या प्रादूर्भावामुळे गेली दोन वर्षे बंद असलेली समाजकल्याण विभागाची शासकीय वसतीगृहे व शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय समाजकल्याण विभागाने घेतला आहे. या शासकीय वसतिगृह व शासकीय निवासी शाळांमध्ये सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेश प्रक्रिया देखील सुरू करण्यात आली आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील मुलांचे ३ व मुलींचे ४ वसतिगृहांचा समावेश आहे.


रायगड जिल्ह्यात जावळी, तालुका माणगाव येथे शासकीय निवासी शाळा कार्यरत आहे. त्यामुळे इच्छुक विद्यार्थ्यांनी संबंधित जिल्ह्याच्या शासकीय वसतीगृह व शासकीय निवासी शाळेमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन समाजकल्याण विभाग मुंबई विभागाच्या उपायुक्त वंदना कोचुरे यांनी केले आहे.

करोनाच्या प्रादूर्भावामुळे गेली दोन वर्षे शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा बंद होत्या, मात्र सध्या कोरोनाचा प्रादूर्भाव कमी होऊ लागल्यामुळे अनेक महाविद्यालये सुरू झालेली आहेत. त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राहण्याची सोय व्हावी, यासाठी समाजकल्याण विभागाने शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. समाजकल्याण विभागामार्फत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहे चालविली जातात. या वसतिगृहात व निवासी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना निवास, भोजन, निवार्ह भत्ता व इतर शैक्षणिक सुविधा शासनामार्फत दिल्या जातात. वसतिगृहात प्रवेशाकरिता अनुसूचित जाती या प्रवार्गासाठी ८० टक्के, तर इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना २० टक्के जागा राखीव असतात.

# रायगड सुरक्षा मंडळाचे निवड झालेले हजारो सुरक्षा रक्षक नोकरीच्या प्रतीक्षेत

**पनवेल : वार्ताहर**

रायगड सुरक्षा मंडळाच्या माध्यमातून सर्वप्रकारची प्रक्रिया पूर्ण करून प्राप्त उमेदवारी अर्जांपैकी ३२०१ सुरक्षा रक्षकांची सुरक्षा मंडळात २६ डिसेंबर २०२०मध्ये निवड केली. २०१९मध्ये यासंदर्भात मंडळाने भरती प्रक्रिया राबविली होती, मात्र एक वर्षाचा कालावधी लोटूनदेखील हजारो मंडळांत निवड झालेले सुरक्षा रक्षक अद्यापही नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. शासनासह खाजगी आस्थापना मंडळाने वेळोवेळी मागणी करूनदेखील सुरक्षा मंडळाच्या सुरक्षा रक्षकांना सहभागी करून घेण्यास तयार नसल्याचे दिसून येत आहे.



(प्रातिनिधीक छायाचित्र)

२०१९ साली रायगड सुरक्षा मंडळाच्या माध्यमातून भरती प्रक्रिया राबविण्यात आली. या वेळी सुमारे १०,९९८ अर्ज मंडळाला प्राप्त झाले होते. प्राप्त अर्जाच्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर ५८६२ जणांची प्रथमदर्शनी निवड प्रक्रियेसाठी निवड झाली. मैदानी आणि शारीरिक चाचणी पूर्ण झाल्यावर ४०५० जण पुढील भरती प्रक्रियेसाठी निवडले गेले. पोलीस पडताळणी, तसेच वैद्यकीय तपासणीत अंतिम ३२०१ उमेदवार निवडले गेले, मात्र यापैकी ४०० ते ५०० सुरक्षा रक्षकांची मंडळात निवड झाली. भरती प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी मंडळाने सेराईज टेक सोल्युशन प्रा. लि. या कंपनीला काम देण्यात आले होते. या सर्व प्रक्रियेतून पार पडायला सुमारे दोन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाला, मात्र तरीदेखील अद्याप जवळपास २५००पेक्षा जास्त उमेदवार नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत.

या संदर्भात रायगड सुरक्षा मंडळाचे अध्यक्ष समीर चव्हाण यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

# रहदारीस अडथळा असलेला खड्डा नगरसेवक विक्रांत पाटील यांनी बुजवला

**पनवेल : वार्ताहर**

राष्ट्रीय महामार्गाहून पनवेल शहरात येणाऱ्या गार्डन हॉटेलजवळील रस्त्यावर खड्डा पडल्यामुळे रहदारीस अडचण निर्माण होत होती. महामार्ग आणि त्यात सिग्नल असल्याने शहरात येणाऱ्या आणि शहराबाहेर पडणाऱ्या वाहनांना वळण घेण्यास अडथळा येत होता. त्यामुळे वाहतूक कोंडी होण्याचे प्रमाण वाढत होते. नगरससेवक विक्रांत पाटील यांनी यावर मार्ग काढला आहे.

याबाबतची तक्रार महापालिका अधिकाऱ्यांना पत्राद्वारे देण्यात आली होती, पण बरेच दिवस या विषयावर कोणतीच कारवाही होत नसल्याने कार्यक्षम नगरसेवक विक्रांत पाटील यांनी कॉन्ट्रॅक्टरला सांगून कॉंक्रीट मागवून घेतले व स्वतः जातीने उभे राहून खड्डा बुजवून घेतला.




आपल्या प्रभागातील समस्यांचे निरसन नगरससेवक विक्रांत पाटील त्वरित करून घेतात याबद्दल नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.

# रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी यांचा वाढदिवस साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत जुनियर कॉलेजचे शिक्षक, संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य, रयत बँकेचे संचालक आणि वाशी शाखा चेअरमन प्रमोद कोळी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा झाला.



विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याला उपप्राचार्य जगन्नाथ जाधव, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, 'रयत'चे लाईफ वर्कर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, रयत सेवक संघाचे रायगड प्रदेशाध्यक्ष नुरा शेख, ज्योत्स्ना ठाकूर, चित्रा पाटील, संदीप भोईर, जयराम ठाकूर, जुनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, सर्व अध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले, तर पर्यवेक्षक दीपक भर्णुके यांनी आभार मानले.



**पनवेल : न्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जितेंद्र दामोदर म्हात्रे यांची कन्या अस्मिता (राणू) हिचा विवाह गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते अजय जनार्दन भगत यांचे चिरंजीव अनुप (पिंटू) यांच्याबरोबर झाला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उद्योजक जे. एम. म्हात्रे आदींसह विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी, ग्रामस्थांनी वधू-वरांस शुभाशीर्वाद दिले.**




**पनवेल : नेरेपाडा येथील पत्रकार मयूर तांबडे आणि ऋतुजा झिंजे यांचा विवाह नुकताच झाला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून वधू-वरांस शुभाशीर्वाद दिले.**

# दादासाहेब लिमये यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुधागड एज्युकेशन सोसायटी पालीचे माजी अध्यक्ष स्वर्गीय शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये यांच्या जयंतीनिमित्त कोकण विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे कळंबोली येथे आयोजन करण्यात आले आहे.



वक्तृत्व स्पर्धेसाठी खालील विषय ठेवण्यात आले आहेत. शिक्षण-ऑनलाईन की ऑफलाईन, बदलते निसर्ग चक्र, कोरोना आणि सामाजिक अर्थव्यवस्था, कर्मयोगी शिक्षणमहर्षी स्व. दादासाहेब लिमये, आपत्ती व्यवस्थापन एक सामाजिक जबाबदारी यापैकी एका विषयावर स्पर्धकांनी ४+१ मिनिटे आपला विषय मांडावयाचा आहे. प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाचे दोन स्पर्धक पाठवायचे आहे. स्पर्धकाला ओळखपत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नाही. स्पर्धेचे माध्यम मराठी, हिंदी किंवा इंग्रजी राहील. प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम तारीख २७ नोव्हेबर २०२१ राहील. या स्पर्धेचे प्रवेश शुल्क १०० रुपये आहे. ही स्पर्धा मंगळवारी, ३० नोव्हेंबर रोजी सु.ए.सो.चे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड येथे सकाळी ९ वाजता होणार आहे. अधिक माहिती व प्रवेशिकेसाठी के. व्ही. काशिद ९९६९१८०१४५, एल. के. जोशी ९८६७०२१०४४ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी केले आहे.

# दुचाकीचोराला पोलिसांकडून अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात उभ्या करून ठेवलेल्या मोटारसायकली चोरणाऱ्या एका सराईत चोरट्यास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून आतापर्यंत तीन मोटारसायकल हस्तगत केल्या आहेत.

गेल्या काही दिवसांपासून पनवेल परिसरात दुचाकी वाहने चोरण्याचे प्रमाण वाढले होते. या संदर्भात पनवेल शहर पोलीस आरोपीचा शोध घेत असताना पो. ना. अशोक राठोड यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली.



त्यानुसार त्याला सापळा रचून अटक केली असता त्याने पनवेल विश्रामगृहाजवळ उभी करून ठेवलेली होंडा ॲक्टीव्हा ५ जी स्कूटरही चोरल्याचे कबूल केले. त्याचप्रमाणे होंडा कंपनीची ॲक्टीव्हा व बजाज कंपनीची पल्सर अशी तीन वाहने पनवेल परिसरातून चोरल्याचे कबूल करून त्याची किंमत जवळपास एक लाख ४५ हजार रुपये इतकी आहे. त्याच्या अटकेमुळे पनवेल परिसरातील अनेक वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

पनवेल परिसरात दुचाकीचोरीचे प्रमाण वाढले आहे. याबाबतच्या अनेक तक्रारी पोलिसांकडे येत असून त्या दृष्टीने तपास केला जात आहे.

# उरण येथे श्रीस्वामी समर्थ बालसंस्कार वर्ग

**उरण : वार्ताहर**

आखिल भारतीय श्रीस्वामी समर्थ गुरुपीठ त्रंबकेश्वर (नाशिक) बालसंस्कार व युवा प्रबोधन विभाग यांच्या वतीने उरण शहरात श्री स्वामी समर्थ केंद्र आनंद नगर येथे रविवारी (दि. २१) सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत एकदिवसीय बालसंस्कार शिबिर घेण्यात आले. या शिबिरात उरण शहरातील एन. आय. हायस्कूल, सेंट मेरीज हायस्कूल, यू. ई. एस. हायस्कूल, रोटरी स्कूल आदी शाळांमधून ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते. या बालसंस्कार वर्गात ४ ते १५ वर्षे वायोगटातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

शिबिराची सुरुवात स्वामींच्या भूपाळीने करण्यात आली. शिबिरात मुलांना मेडिटेशनचे फायदे व ते कसे करावे हे शिकवण्यात आले. स्तोत्र, मंत्र पठण, तसेच खेळ घेण्यात आले. याचबरोबर चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व बौद्धिक मापन टेस्ट घेण्यात आली. पूर्ण एक दिवस मुलांनी मोबाइलशिवाय घालवला व नवीन गोष्टी आत्मसात केल्या. शेवटी सर्व विद्यार्थ्यांचे सर्टिफिकेट देऊन व स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना केंद्र प्रतिनिधी व पालकवर्ग यांच्या हस्ते बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. संपूर्ण शिबिराचे नियोजन बालसंस्कार प्रतिनिधी, केंद्र प्रतिनिधी व कार्यरत सेवेकरी वर्गाने केले. उरण आनंदनगर येथील श्रीस्वामी समर्थ केंद्रात दर शनिवारी संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत बालसंस्कार वर्ग घेण्यात येतात, असे केंद्र प्रतिनिधीने माहिती देताना सांगितले.




**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Tender / RFX | Description | Esti. Cost. |
|---|---|---|
| Tend-16/ 21-22 **7000021433** | Overhauling of ABB make 100kV CB at various EHV Substation under Panvel circle. | Rs. 97.70 Lakh |

EMD 1% of estimated cost & Tender fee Rs. 500/- + GST **Submission of bids from 24.11.2021 to 01.12.2021 up to 11.00 hrs., Bid opening date:- 01.12.2021 if possible.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459625.

**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



**कागदपत्र गहाळ झालेबाबत**

**खाली वर्णन केलेले मूळ कागदपत्र गहाळ झालेबाबत जाहीर हरकती मागविण्यात येत आहेत.**

मौजे पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे प्रॉपर्टी क्र. १२६८/बी-१ यावर बांधणेत आलेली इमारत सचिन अपार्टमेंट व सचिन को.ऑप.हौ. सोसायटीमधील गाळा क्र. ४, क्षेत्र १५० चौ.फूट बांधीव या मिळकतीचे संदर्भातील खालील कागदपत्र
१) नोंदणीकृत ॲग्रीमेंट फॉर सेल श्री. अशोक जितमल बांठिया व श्री. छगनलाल कपुरजी सोळंकी यांचेत दिनांक १२/१०/१९९२ रोजी झालेला.
२) नोंदणीकृत सेल डीड श्री. छगनलाल कपुरजी सोळंकी व श्री. मदन मोहन नारायण शर्मा यांचेत झालेला दिनांक २०/६/१९९६ रोजीचा.

सदर मूळ कागदपत्रे गहाळ झाले आहेत. कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेच्या ताब्यात सदर मूळ कागदपत्र असल्यास खालील पत्त्यावर सदर कागदपत्रे आणून द्यावी ही विनंती. कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेच्या सदर मिळकतीत तारण, बोजा गहाण हक्क अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी त्याबाबत खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रकाशित झाले तारखेपासून ७ दिवसांचे आत कळवावे. मात्र या कालावधीनंतर मागाहून येणारे कोणत्याही तक्रारींचा व हरकतींचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

दि. २३/११/२०२१

**सही/-**
**श्री. प्रफुल्ल म्हात्रे**
(ॲडव्होकेट हाय कोर्ट व नोटरी भारत सरकार)
११, केशव वसंत, जुने तहसील कार्यालयासमोर,
पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

## संपादकीय

# कुंपणच शेत खातंय

मुंबई पोलिसांची भीती एका माजी पोलीस आयुक्तांनाच वाटते हे ऐकून न्यायमूर्ती देखील चक्रावून गेल्याच्या बातम्या प्रसारित झाल्या आहेत. जिथे पोलीस आयुक्तच सुरक्षित नाहीत, अशा राज्यातील कायदा सुव्यवस्थेला काय म्हणावे? महाविकास आघाडी सरकारचा कारभार किती रामभरोसे चालला आहे याचेच हे द्योतक आहे. येथील मुंबईसारख्या एका अफाट महानगराचा माजी पोलीस आयुक्त पोलिसांना घाबरतो, अंडरवर्ल्डला नव्हे.

**महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेची लक्तरे निघताना बघून कुठल्याही सुजाण नागरिकाच्या हृदयाला यातना होत असतील. महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्याला आता दोन वर्षे पूर्ण होतील. या २४ महिन्यांमध्ये राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची मात्र पुरती वाट लागली आहे. त्याचे ताजे उदाहरण म्हणून अमरावती, मालेगाव आणि नांदेड येथील दंग्यांकडे बोट दाखवता येईल. गेल्या कित्येक वर्षांत अशा प्रकारचे दंगे महाराष्ट्रात झाले नव्हते. भारतीय जनता पक्षाच्या सरकारने पाच वर्षे राज्याचा गाडा हाकला, त्या काळातही एकही दंगल झाली नाही. ही बाब पुरेशी बोलकी आहे, परंतु महाराष्ट्र आणि मुंबईतील कायदा आणि सुव्यवस्था रसातळाला गेल्याचा सर्वात मोठा पुरावा सोमवारी सर्वोच्च न्यायालयातच माननीय खंडपीठासमोर ठेवण्यात आला असे म्हणावे लागेल. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की मुंबई पोलिसांकडून जीवाला धोका असल्यामुळेच माजी पोलीस आयुक्त प्रत्यक्ष उपस्थित राहू शकत नाहीत. ते भारतातच आहेत. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांची पत्राद्वारे पोलखोल करून परमबीर सिंह गायब झाले. हे पत्र त्यांनी अन्य कुणाला नव्हे तर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनाच पाठवले होते. खंडणीवसुलीच्या आरोपाखाली माजी गृहमंत्री सध्या तुरुंगात गजाआड आहेत. गृहमंत्र्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून परमबीर सिंह मात्र परदेशात पळून गेल्याच्या वावड्या उठवण्यात आल्या. या वावड्या अर्थातच महाविकास आघाडीच्या नेत्यांनी पद्धतशीर पेरल्या होत्या हे वेगळे सांगायची गरज नाही. परमबीर सिंह हे पळपुट्याप्रमाणे बेल्जिअमला पळून गेले असल्याचा जावईशोध देखील काँग्रेस नेत्यांनी लावला होता, परंतु सर्वोच्च न्यायालयात परमबीर सिंह यांच्या वकिलांनी वस्तुस्थिती समोर आणली. या राज्याचा गृहमंत्री खंडणीखोरीच्या लांच्छनास्पद आरोपाखाली गजाआड आहे. या राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा खाजगी चिटणीस स्वत:च्याच बेकायदा बंगल्याचे बांधकाम निमूटपणाने पाडून टाकतो आणि सत्ताधारी पक्षाचा प्रवक्ता सक्तवसुली संचालनालयाकडे ५५ लाखांचा दंड भरून मूग गिळून बसतो. या राज्याचा वनमंत्री एका तरुणीच्या गूढ मृत्यूप्रकरणी संशयाच्या भोवऱ्यात आहे, तर दुसरे एक मंत्री वैयक्तिक चिखलफेकीमध्ये मश्गुल आहेत. तब्बल ९० हजार एसटी कर्मचाऱ्यांचा संप हाताळण्यामध्ये परिवहनमंत्री सपशेल तोंडघशी पडले आहेत तर राज्यातील उद्योग-व्यवसाय दुसऱ्या राज्यात पळून जाताना उद्योगमंत्र्यांनाच पाहात राहावे लागत आहेत. असा आहे सध्याच्या महाविकास आघाडी सरकारचा कारभार. कायदा व सुव्यवस्था बिघडल्यास आणि सरकारला परिस्थिती हाताळण्यात अपयश आल्यास महनीय राज्यपाल आघाडी सरकारची ही बेबंद राजवट बरखास्त करू शकतात. तशी संविधानामध्ये तरतूद आहे. माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांचे सर्वोच्च न्यायालयातील स्पष्टीकरण महाविकास आघाडी सरकारच्या निर्णायकी कारभारावर चांगलाच प्रकाश टाकणारे आहे. कुंपणच शेत खाऊ लागल्यावर शिवाराच्या मालकाने कुणाकडे पाहावे?**

# वृद्धाश्रमाची होतेय फॅशन?



**खबरबात**
**नितीन देशमुख**

आपल्याकडे डान्स बार, क्लबमध्ये जाणे एक फॅशन आहे. त्यामुळे सगळीकडे त्याचे पेव फुटत आहे. तशीच वृद्धाश्रमाची फॅशन होत असल्याने पुढील काळात वृद्धाश्रमात वाढ होईल. ते थांबवण्यासाठी जनरेशन गॅप भरली पाहिजे. नवरा-बायको दोघेही नोकरी करीत असतील आणि घरात काळजी घेण्यासाठी कोणी नाही म्हणून ज्येष्ठांना वृद्धाश्रमात ठेवणे ठीक आहे. पण फॅशन म्हणून त्यांना वृद्धाश्रमात ठेवणे चूक असल्याचे मत समाजकार्याचा विद्यार्थी (एमएसडब्ल्यू) अजिंक्य गजाकोश याने नवीन पनवेलमधील अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक कट्ट्यावर बोलताना व्यक्त केले. त्यात सत्य आहे, यामध्ये शंका नाही.

मातृदिन, पितृदिन साजरा करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून बेगडी प्रेम दाखवणारे काही महाभाग आपल्या आई-वडिलांना घरातील एक अडचण समजतात. त्यांना एक तर वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवतात, नाही तर त्यांचा शारीरिक आणि मानसिक छळ करीत असल्याचे दिसून येत आहे. यामध्ये गरीब, श्रीमंत किंवा उच्चशिक्षित असा भेदभाव नाही. परदेशात राहणाऱ्या मुलांना आपल्या आई-वडिलांचा घरात मृत्यू झाल्याचे अनेक महिने माहीत नसल्याच्या किंवा अंत्यसंस्काराला उपस्थित राहू शकत नसल्याने त्यांना व्हॉट्सअॅपवर दाखवा सांगणाऱ्या आजच्या तरुणांच्या बातम्या आपण वाचत असतो.

श्रीमंत असो वा गरीब आई शेवटी आईच असते. मुलगा कितीही मोठा झाला तरी तिला तो लहानच असतो. आपले कितीही हाल झाले तरी ती मुलाची काळजी करीत असते. नवी मुंबईत राहणाऱ्या एका मध्यमवयीन महिलेने आपल्या पतीच्या निधनानंतर लोकांची भांडी घासून मुलाला मोठे केले, पण त्याला दारूचे व्यसन लागले. त्यामुळे नोकरी नाही. आईच्या पैशावर जगताना मुलगा आईला काम करून आल्यावर रात्री एक तासही झोपू देत नाही. आई आजारी आहे तरी रात्री घरी आल्यावर तिला मारतो, प्रसंगी नशेत आईजवळ अश्लील वर्तन करण्याचाही प्रयत्न करतो. आई रडत तक्रार करते, पण आपण त्याला सोडून गेलो तर त्याला खायला कोण घालेल म्हणून त्याला सोडून जायला ती तयार नाही. आपल्या मुलाच्या काळजीने त्याच्या सगळ्या चुकाही ती माफ करताना दिसते.

ज्यांनी आपल्याला या जगात आणले, वाढविले त्या वडिलांनाच फसवल्याची हृदयद्रावक घटनाही नगर जिल्ह्यात समोर आली होती. तुमच्या डोळ्याचे ऑपरेशन करायचे आहे, त्यासाठी सप्तशृंगगडावर जायचे आहे, असे सांगून राहुरी तालुक्यातील एका मुलाने आपल्या वृद्ध पित्याला सप्तशृंगगडावर आणले आणि त्यांना गडाच्या पहिल्या पायरीजवळच बसण्यास सांगून स्वतः तेथून पोबारा केला. हा धक्कादायक प्रकार मंदिराच्या सुरक्षा कर्मचाऱ्यामुळे उघडकीस आला. या दुर्दैवी पित्यास सध्या गडाच्या पायथ्याशी असलेल्या एका वृद्धाश्रमात ठेवण्यात आले आहे. स्वतःच्या दृष्टिहीन जन्मदात्या पित्याला दीडशे किमी दूर नेऊन त्याला एकटेच निराधारपणे सोडून त्याचा पोटचा मुलगा पलायन करतो, यावर वरवर विश्वास बसत नसला, तरी हे सत्य आहे.

एप्रिल, मे आणि जून हे तीन महिने म्हणजे सुट्टीची मजा घेण्याचे महिने. याच कालावधीत मदर्स डे म्हणजे मातृदिन ही आपण १२ मे ला साजरा करतो. याच तीन महिन्यात ज्येष्ठ नागरिकांना शारीरिक आणि मानसिक त्रास दिल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात दाखल होत असल्याची धक्कादायक माहिती सीबीडी पोलीस ठाण्यातील महिला व मुलांकरिता असलेल्या सहाय्यक कक्षातील सोशलवर्कर आसावरी जाधव यांनी दिली. उच्चशिक्षित आणि उच्चवर्गीय महिला आणि पुरुष ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या मुलांकडून शारीरिक आणि मानसिक त्रास दिला जातो. त्यांना काठीने टोचण्यापर्यंत मुलांची मजल जात असल्याचे आसावरी जाधव यांनी सांगितले. आई-वडिलांवरून वाद झाल्यास तरुण पिढी विभक्त होण्याची टोकाची भूमिकाही घेताना दिसत आहेत. त्यामुळे आजची तरुण पिढी कोठे चालली आहे, असा प्रश्न पडत आहे.

पनवेल-रसायनी रस्त्यावर असलेल्या कसळखंड येथील दातार इन्स्टिटच्यूटमध्ये वृद्धाश्रमातील आजी-आजोबांसाठी संजय दातार हे दरवर्षी आनंदोत्सव साजरा करतात. रायगडसह नवी मुंबई व ठाणे जिल्ह्यातील वृद्धाश्रमामधील ३०० पेक्षा जास्त आजी, आजोबा यामध्ये सहभागी होतात. मराठी पद्धतीने दिवा ओवाळून प्रत्येकाचे स्वागत करण्यात येते निरनिराळे खेळ, गाणी, नृत्य, ड्रामा असे भरगच्च कार्यक्रम ठेवण्यात येतात. या वेळी 'कोई लौटा दे मुझे मेरे बिते हुए दिन' असेच त्यांना वाटते. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मला समाधान मिळते असे संजय दातार सांगतात. चहा, नाष्टा व जेवण आग्रह करून वाढणारे आणि प्रत्येकाची चौकशी करणारे संजय दातार, प्रशांत नायर, चेतना अभ्यंकर व त्यांचे सहकारी पाहून या ज्येष्ठांचे डोळे पाणावतात.

खारघरच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील एमएसडब्ल्यू करणारे विद्यार्थी प्रतिभा शिंदे, पूनम कुटे, प्रणाली पाटील, सूचिता कांबळे, शोभा वाघमारे, हर्षाली चव्हाण व अजिंक्य गजाकोश हे आपल्या प्रोजेक्टसाठी ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांचा अभ्यास करीत आहेत. त्यासाठी त्यांनी अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाश विचारे, सचिव साहेबराव जाधव, गोपाल धारपवार, सुरेंद्रनाथ पाटील यांची भेट घेतली. त्या वेळी त्यांनी, आपण परिसरातील समस्या सोडवण्यासाठी आपली वेदना, दुःख विसरून काम करीत असतो. आपल्या संघाचे १०० पेक्षा जास्त सदस्य आहेत. ते पनवेल रेल्वे स्टेशनच्या पूर्वेला असलेल्या कट्ट्यावर रोज सकाळ-संध्याकाळ एकत्र येतात. यामध्ये विविध क्षेत्रांतून निवृत्त झालेली वेगवेगळ्या प्रांतातील अनुभवी माणसे आहेत. आपल्या सोसायटीतील विजेचा किंवा पाण्याचा प्रश्न असो, नाही तर रेल्वे किवा एनएमएमटीच्या बसचा प्रश्न, तो सोडवण्यासाठी धडपडत असतात. त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार्यालयात फेऱ्या मारतात. तो प्रश्न सुटल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासारखा असतो. यामधील काही प्रश्न सुटले नाही म्हणून यांचे काही अडणार नसते. आजच्या तरुण पिढीला वेळ नसतो, त्यांचे प्रश्न सोडवण्याचे काम हे ज्येष्ठ नागरिक करीत असतात.

शासनाने ज्येष्ठ नागरिकांसाठी कायदा केला. त्यांचा सांभाळा न करणाऱ्या मुलांना या कायद्यामुळे शिक्षा होऊ शकते, मात्र आई-वडील सगळे विसरून आपली तक्रार मागे घेत असल्यामुळे या कायद्याची भीती कोणाला वाटत नाही. या कायद्याखाली शिक्षा होण्याचे प्रमाण कमी आहे, असे एमएसडब्ल्यूच्या विद्यार्थ्यांनी सांगितले. शासनाच्या वृद्धाश्रमांची अवस्था खूप खराब आहे. तेथे ज्येष्ठ नागरिकांना साधे पांघरून मिळत नाही. बेडही व्यवस्थित नसतो, त्यांची काळजी व्यवस्थित घेतली जात नाही. फक्त कागदोपत्री उपक्रम घेतल्याचे दाखवले जाते, असे अनुभव या विद्यार्थ्यांनी सांगितले. फक्त हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्याच ठिकाणी चांगली सोय असते.

*ज्येष्ठ नागरिक संघातील खेळीमेळीचे वातावरण आणि या वयातही स्टेज कार्यक्रम घेणे, महिला व पुरुषांचा घरच्या समस्या विसरून असलेला सहभाग हा पॉझिटिव्ह एनर्जी देणारा वाटला. आपण आपल्या पुढच्या काळात असे काही तरी सेव्हिंग केले पाहिजे, असे वाटले.*

*-पूनम कुटे, ग्रुप लीडर*

*वृद्धाश्रमाला 'केअर होम' म्हणतात, पण नाव बदलले तरी घर ते घर असते. कुटुंबात राहण्यात आणि तेथे राहण्यात फरक असतोच. आयुष्यात लहान मूल, आई-वडील या भूमिका राबवताना आपण खूश असतो, तसेच वृद्धत्वातही आनंदी राहिले पाहिजे.*

*-शोभा वाघमारे*

# माथेरानमधील पाण्याचे दर कमी करा

## अन्यथा उपोषण; मनसेचा इशारा

**कर्जत : बातमीदार**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून माथेरानमध्ये पाणीपुरवठा केला जातो. त्या पाण्याचा प्रति एक हजार लिटरचा दर हा देशात सर्वात जास्त आहे. त्यामुळे येथील सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले असून माथेरानमधील पाण्याचे दर कमी करा; अन्यथा उपोषण करण्याचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने दिला आहे.



(छाया : संतोष पेरणे)

पर्यटनस्थळ म्हणून माथेरानची ओळख आहे. येथे आलेल्या पर्यटकांना व स्थानिक नागरिकांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा (एमजेपी)कडून पाणीपुरवठा केला जातो.हॉटेल मालकांना हा दर कमर्शियल तर स्थानिकांना डोमेस्टिक पद्धतीने अकारला जातो. लॉकडाऊननंतर एमजेपीने कोणतीही पूर्वसूचना न देता पाणीदरात वाढ केली. ही दरवाढ जाचक असल्याने येथील स्थानिक जनता मेटाकुटीला आली आहे. दरम्यान, पाणी दरवाढ बारा दिवसांत कमी न केल्यास उपोषण करण्याचा इशारा मनसेने एमजेपीच्या अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

मनसेचे कर्जत तालुका अध्यक्ष महेंद्र निगुडकर, माथेरान शहर अध्यक्ष संतोष कदम, उपाध्यक्ष असिफ खान, सचिव रवींद्र कदम यांनी एमजेपीच्या कर्जत येथील कार्यालयात जाऊन उपअभियंत्यांना निवेदन दिले. माथेरानची पाणी दरवाढ बारा दिवसात कमी केली नाही तर श्रीराम चौकात उपोषण करण्याचा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

दर तीन वर्षानंतर पाणी दरवाढ केली जाते. या दरवाढीचे सर्वाधिकार मंत्रालयात आहेत, असे एमजेपीकडून सांगण्यात आले.

**एमजेपीने माथेरानमध्ये केलेल्या पाणी दरवाढीने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. पर्यटन अजूनही बहरलेले नाही. अशात नागरिकांनी फक्त वाढीव पाणी बिले भरायची का? त्यामुळे पाणी दरवाढ कमी करावी, या मागणीसाठी आम्ही उपोषणाचा इशारा दिला आहे.**

**-संतोष कदम,**
**मनसे शहर अध्यक्ष, माथेरान**

# गुरव समाज संस्थेची बैठक

**पेण : प्रतिनिधी**

गुरव समाज रायगड, ठाणे, मुंबई या संस्थेची मासिक बैठक संस्थेचे अध्यक्ष बंडू खंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे सहखजिनदार संजय मोरे यांच्या सहकार्याने पनवेल येथे नुकतीच झाली.

संस्थेचे अध्यक्ष बंडू खंडागळे यांनी प्रास्ताविक केले. बैठकीमध्ये नियोजित समाज मंदिरासाठी निधी संकलन करण्याबाबत रुपरेषा ठरविण्यात आली. समाजहिताच्या कार्याबाबत चर्चा झाली. नवीन वर्षाची दिनदर्शिका बनविण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला. प्रसन्ना गुरव यांची संस्थेचे ठाणे जिल्हाप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली.

संस्थेचे कार्याध्यक्ष विजय साळुंखे, सुरेश गुरव, माजी अध्यक्ष रमेश राजगुरव, खजिनदार भाऊ दळवी, सरचिटणीस उमेश खंडागळे, उपाध्यक्ष किशोर गुरव, भारती काळे, कृष्णकांत नीलकंठ, सुरेश दळवी सहखजिनदार शैला खंडागळे, सहखजिनदार संजय मोरे, सोशल मीडिया प्रमुख अमृता गुरव (काळे), ठाणे जिल्हाप्रमुख प्रसन्ना गुरव, माधुरी मोरे, चिंटू मोरे अन्य समाज बांधव या बैठकीला उपस्थित होते.



(छाया : अनिस मनियार)

# बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पालीमध्ये गर्दी

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायकांपैकी एक स्थळ असलेल्या पाली (ता. सुधागड) येथील बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी मंगळवारी (दि. २३) भाविकांची अलोट गर्दी झाली होती.


धार्मिक स्थळे, मंदिरे दर्शनासाठी खुली झाल्याने भाविकांच्या संख्येत कमालीची वाढ झाली आहे. अंगारकी चतुर्थीच्या निमित्ताने बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी मंगळवारी पालीमध्ये गर्दीचा उच्चांक गाठला. मुंबई, ठाणे, पुणे आदी शहरांतील भाविक व पर्यटक मोठ्या प्रमाणावर पालीत दाखल झाले होते. त्यांनी सकाळपासूनच दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते.

बल्लाळेश्वर मंदिर परिसरातील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार, फुले व पापड मिरगुंड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले जय्यत तयारीत होते. परिसरात गावठी भाज्या, फळे, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक महिला विक्रेत्या बसल्या होत्या. देवळात येणारे भाविक आवर्जून ते खरेदी करत होते.

भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

### वाहतूक कोंडी

*पालीत दाखल झालेल्या भाविकांच्या गाड्यांमुळे वाहतूक कोंडी झाली होती. पोलीस व बल्लाळेश्वर देवस्थानचे सुरक्षा रक्षक वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करत होते. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने पाली पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक नाक्यावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.*



(छाया : धम्मशील सावंत)



**दीड-दोन वर्षानंतर मंदिर सुरू झाल्याने बाप्पाच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने येत आहेत. पर्यटकदेखील मोठ्या प्रमाणावर येत आहेत. त्यामुळे व्यवसायदेखील चांगला झाला.**

**-अमित वरंडे, व्यवसाईक, पाली, ता. सुधागड**

**बल्लाळेश्वर मंदिर व परिसर भाविकांनी फुलून निघाला आहे. देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांसाठी शुद्ध थंड पाणी व सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात आली आहे. रांगेत उभे राहण्यासाठी रेलिंग व शेड उभारण्यात आली आहे. वाहने उभी करण्यासाठी दोन मोफत वाहनतळ उपलब्ध आहेत. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही.**

**-अॅड. धनंजय धारप, अध्यक्ष,**
**बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली**

# नेरळ मोहाचीवाडीतील महिलांची फसवणूक

## सोन्या-चांदीच्या दागिन्यासह भांडी घेऊन फेरीवाल्या महिला फरारी

**कर्जत : बातमीदार**

जुनी भांडी नवीन करून देतो, असे भासवून दोन फेरीवाल्या महिलांनी नेरळ मोहाचीवाडी (ता. कर्जत) गावातील १५ महिलांची फसवणूक केली. तसेच गावातील काही महिलांचे सोन्याचांदीचे दागिने घेऊन या फेरीवाल्या महिला फरार झाल्या आहेत. याबाबत काही ग्रामस्थ महिलांनी नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

डोक्यावर भांडी घेऊन कर्जत तालुक्यात गावोगावी फिरणाऱ्या दोन महिलांनी (सासू-सुन) नेरळ मोहाचीवाडीमधील अनेक महिलांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. सर्वप्रथम या फेरीवाल्या सासू - सूनांनी मोहाचीवाडीतील महिलांना बोलण्यातच गार करून विश्वास संपादित केला. जुनी भांडी घेऊन त्या नवीन भांडी देऊ लागल्या. त्या बदल्यात या सासू, सूना ग्रामस्थ महिलांकडून ३० ते ४० रुपये घेत होत्या. त्यानंतर तुमचे दागिने छान आहेत, फोटो काढून ते परत आणून देतो, असे सांगून त्या दोघींनी मोहाचीवाडी गावातील तब्बल १५ महिलांकडून भांडी, सोन्या-चांदीचे दागिने घेऊन पोबारा केला.

या प्रकरणी मोहाचीवाडी गावातील काही महिलांनी नेरळ पोलीस ठाण्यात आपली फसवणूक झाल्याची तक्रार दाखल केली.



# बल्लाळेश्वर भाजपला कौल देणार

## पाली नगरपंचायतीमध्ये कमळ फुलणार -आमदार प्रशांत ठाकूर

**पाली : प्रतिनिधी**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी अंगारक चतुर्थीच्या पूर्वसंध्येला सोमवारी (दि. २२) पालीतील बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले. बल्लाळेश्वराचा कौल भाजपच्या बाजूने असून नगरपंचायतीच्या आगामी निवडणुकीत पालीमध्ये 'कमळ' फुलणार असल्याचा विश्वास आमदार ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केला.

काही दिवसांत पाली नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक होणार असून भाजप ही निवडणूक लढवणार आहे.



आम्हाला भाजपच्या माध्यमातून पालीतील जनतेची सेवा करायची आहे. त्यासाठी आम्हाला संधी, बळ आणि आशीर्वाद दे, अशी प्रार्थना बल्लाळेश्वराकडे केली. बल्लाळेश्वर भाजपच्या बाजूने नक्कीच कौल देईल, असे आमदार प्रशांत ठाकूर या वेळी म्हणाले.



भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, सरचिटणीस अविनाश कोळी, मिलिंद पाटील, महिला मोर्चा दक्षिण जिल्हा उपाध्यक्ष वैशाली मपारा, सुधागड तालुका अध्यक्ष आरती भातखंडे, योगिनी भातखंडे, तालुका अध्यक्ष चंद्रकांत घोसाळकर, सरचिटणीस सागर मोरे, पाली शहराध्यक्ष उमेश मढवी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष रोहन दगडे, सरपंच शरद चोरघे तसेच प्रसाद लखिमळे, भाऊ गांधी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चौल मुख्य रस्त्याची साईडपट्टी धोकादायक

## झाडे-झुडपे देताहेत अपघाताला निमत्रंण



**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग ते रेवदंडा मार्गावरील चौल भाटगल्ली ते मुखरी गणपती मंदिर या मुख्य रस्त्यालगतची साईडपट्टी झाडे, झुडपांनी वेढली गेल्याने अपघातास निमत्रंण ठरत आहे.

अलिबागकडून रेवदंड्याकडे जाताना मुखरी गणपती मंदिर ते चौल भाटगल्ली मुख्य रस्त्यालगत डाव्या बाजूस पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी मोठे गटार आहे. या गटाराच्या साईडपट्टीवर झाडेझुडपे उगवल्याने येथून जा-ये करत असलेल्या वाहनाच्या नजरेत रस्ता येत नाही. अंरूद असलेल्या या रस्त्यावरून एकाचवेळी दोन मोठी वाहने जात असताना साईडपट्टी न कळल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. शिवाय एक मोठे वाहन येथून जा-ये करत असेल तर लहान चारचाकी वाहन चालकांनासुध्दा साईडपट्टीच्या झाडेझुडपांमुळे रस्त्याचा अंदाज न आल्यास मोठा अपघात घडण्याची शक्यता आहे.

या रस्त्यातच चौल मुखरी गणपती मंदिरासमोर मुख्य रस्त्यावर एक मोठा खड्डा पडला आहे, हा खड्डा येथून जाणाऱ्या छोटया मोठया वाहनास त्रासदायक ठरत आहे. हा खड्डा चुकविताना चालकांनी नियत्रंण गमाविल्यास वाहन थेट गटारात जाऊन पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. मात्र संबधीत विभाग त्याकडे कानाडोळा करीत आहे. या रस्त्याच्या साईडपट्टीवर संरक्षक भिंत उभारणे गरजेचे असून संबधीत विभागाने त्वरेने लक्ष्य द्यावे अशी मागणी होत आहे.

# रोह्यात नवमतदार नोंदणी कार्यक्रम

**रोहे : प्रतिनिधी**

घटनात्मक दृष्टीने मतदान नोंदणी महत्वाची असून अठरा वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांने मतदान नोंदणी करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन नायब तहसीलदार तथा तालुका निवडणूक निर्णय अधिकारी साठे मॅडम यांनी केले.



(छाया : महादेव सरसंबे)

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १ जानेवारी २०२२ या अहर्ता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घोषीत करण्यात आला आहे. त्याला अनुसरून येथील डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि रोहा तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात नुकताच नवमतदार नोंदणी कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी नायब तहसीलदार साठे मॅडम मार्गदर्शन करीत होत्या. यावेळी त्यांनी ऑफलाइन व ऑनलाइन मतदार नोंदणी पद्धतीची सविस्तर माहिती दिली.

नवमतदार नोंदणी कार्यक्रम ३० नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी या उपक्रमांतर्गत मतदार नोंदणी करावी, असे आवाहन साठे मॅडम यांनी या वेळी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनंत थोरात यांनी केले. या कार्यक्रमात ३० विद्यार्थ्यांनी ऑनलाइन तर २० विद्यार्थ्यांनी ऑफलाइन पद्धतीने नवमतदार म्हणून नोंदणी केली. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कर्यक्रम अधिकारी व रायगड जिल्हा राष्ट्रीय सेवा योजनचे जिल्हा समन्वयक प्रा. तुळशीदास मोकल, कार्यक्रम अधिकारी सीमा भोसले यांच्यासह विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. प्रा. सुकुमार पाटील यांनी आभार मानले.

# महडच्या गणपती मंदिरात भाविकांची मांदियाळी

**खोपोली : प्रतिनिधी**

कोरोना संसर्ग निर्बंधामुळे महड येथील वरदविनायक मंदिर भाविकांसाठी दिड वर्ष बंद होते, परंतु निर्बंध शिथिल झाल्यामुळे मंगळवारी (दि. २३) अंगारक चतुर्थीला पहाटेपासून मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले होते. त्यामुळे मंगळवारी वरदविनायक मंदिर गणेश भक्तांनी फुलून गेले होते.

मंगळवारी संध्याकाळी पाच वाजेपर्यंत भाविकांचा आकडा ५० हजारांच्या घरात गेला होता. मध्यरात्री बारावाजेपर्यंत दर्शन सुरू राहणार असल्याने गणेशभक्तांची संख्या लाखाच्या आसपास होईल, असे महड देवस्थान समितीचे व्यवस्थापक बडगुजर यांनी सांगितले.


## उप विभागीय अधिकारी पनवेल उप विभाग पनवेल यांजकडून

क्रमांक भूसं/कात-५/प्र.क्र./चिंध्रण/२०२१-ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा-तीन) यांच्या कलम १, पोट कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र, भाग चार-ब, दिनांक २५ ऑगस्ट २०२१ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली दिनांक २५ ऑगस्ट २०२१ ची शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक आयडीसी २०१६/(६११) उ-१४, अन्वये, उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे, त्या अधिसूचनेच्या अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रात सन २०२१ च्या २६ ऑगस्ट २०२१ महिन्यांच्या ३० व्या दिवसापासून अंमलात येतील असा महाराष्ट्र शासनाने निर्देश दिला आहे;

आणि ज्याअर्थी, यामधील अनुसूचीत वर्णन केलेल्या जमिनी उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्तप्रमाणे अंमलात आले आहेत अशा क्षेत्रात आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांना लागू करण्यात आले आहे. अशा क्षेत्रात असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळमार्फत (यात यानंतर ज्याचा उक्त महामंडळ असा निर्देश करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमांच्या उद्दिष्टांच्या पृष्टयर्थ असेल अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ, आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमांच्या कलम ३२ अन्वये राज्य शासनास प्रदान करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (ग) अन्वये काढण्यात आलेली दिनांक ची शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग आय.डी.सी.२०१६/(६११) उद्योग-१४, च्या द्वारे, राज्य शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ यांच्या नियम २८ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांकडे जी कामे सोपविण्यात आली आहेत. अशी उक्त अधिनियमाचे कलम ३२, कलम ३३ पोटकलम (२), कलम ३६ व कलम ३८ खालील जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, पनवेल विभाग पनवेल, जि.रायगड यांची विशेषरीत्या नेमणूक केली आहे :

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र/औद्योगिक वसाहत म्हणून विकसित करण्यासाठी किंवा दोन्हीकरिता म्हणून सोबतच्या अनुसूचीत वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत असे उप विभागीय अधिकारी, पनवेल विभाग पनवेल, जि.रायगड चे मत झालेले आहे.

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम ३२, पोटकलम (२) व उक्त अधिसूचना याखालील राज्य शासनाच्या शक्तींचा वापर करुन, मी, **राहुल मुंडके,** उप विभागीय अधिकारी, पनवेल विभाग पनवेल, जि.रायगड याद्वारे यामध्ये वर्णन केलेल्या जमिनी उक्त प्रयोजनार्थ का संपादन करण्यात येऊ नयेत यासंबंधी दिनांक २५ ऑगस्ट २०२१ पूर्वी खालील सही करणाऱ्यास लेखी स्वरुपात कारण दर्शविण्याबद्दल आपणास फर्माविण्यात आले आहे.

या नोटीसीच्या तारखेनंतर मा. जिल्हाधिकारी यांच्या मंजूरीशिवाय विक्री करुन, पट्टयाने देऊन, गहाण देऊन, अभिहस्तांतरण करुन, अदलाबदल करुन किंवा अन्य रितीने, करावयाच्या उक्त जमिनीच्या विल्हेवाटीसाठी केलेला कोणताही करार किंवा त्यावर केलेला कोणताही खर्च किंवा त्यामध्ये केलेल्या सुधारणा उक्त जमिनीच्या अंतिमतः संपादन करण्यात येतील अशा भागांसंबंधी भरपाई निर्धारित करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून, उक्त अधिनियमाचे कलम ३३, पोटकलम (५) व भूमी संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा १) याच्या कलम २४ (सातव्यांदा) अन्वये विचारात घेतल्या जाणार नाहीत.

ज्यांची व्यक्तीगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीशीच्या तारखेपासून एक महिन्यांचे आत, भेटीची वेळ ठरवून, कोणत्याही दिवशी, **सकाळी ११.०० ते १.०० वाजेपर्यंत** खाली सही करणाऱ्यापुढे जातीने किंवा कायदेशीर मुखत्यारामार्फत हजर रहाता येईल.

**अनुसूची**

**जिल्हा-रायगड, ता.पनवेल, गांव-चिंध्रण**

| अ. क्र. | सर्व्हे नं./गट नं. | हिस्सा नं. | संपादनाचे क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|---|
| १. | १२९ | - | ०.२३० |
| २. | १३० | - | ०.५०३ |
| ३. | १३१ | - | ०.२१० |
| ४. | १३२ | - | ०.१०० |
| ५. | १३३ | - | ०.२५० |
| ६. | १३४ | १ | ०.१४५ |
| ७. | १३४ | २ | ०.१३५ |
| ८. | १३५ | - | ०.२३० |
| ९. | १३६ | - | ०.०६० |
| १०. | १४० | १ | ०.२४० |
| ११. | १४० | २ | ०.२५६ |
| १२. | १४१ | - | ०.३३० |
| १३. | १४२ | - | ०.०४० |
| | | एकूण | २.७२९ |

ठिकाण : पनवेल
दिनांक : /११/२०२१
क्र. जिमाका/राआ/जाहि./१४९/२०२१-२२

सही/-
(राहुल मुडके)
उप विभागीय अधिकारी पनवेल
उप विभाग पनवेल



**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com
कार्यालय जा. क्र. पमपा/कर/हस्तां./२२२१/३४११/२०२१ दिनांक : २२/११/२०२१

**वाचा :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमूद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंदवहीतील नावात बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडेस दाखल झालेले असून, त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं/प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका / गाळा क्र. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | OP९९ | फा.प्लॉट क्र. ८७/११, सदनिका क्र. ००३, मॉडेल सोसा, पनवेल. | मॉडेल को.ऑप.हौ.सोसो, मे.जे.एम. एम.होम्स | स्वर्णिता अमोल गुळवणी, अमोल किशोर गुळवाणी, किशोर दत्तात्रेय गुळवाणी |
| २ | OP९९ | सी टी एस क्र. १३६७/ए१, सदनिका क्र. ए-१०२, उषाप्रभा सोसा, पनवेल. | उषा प्रभा सोसायटी | काशिनाथ लक्ष्मण जाधव |
| ३ | OP९९ | सर्व्हे क्र. ७४५, सदनिका क्र. ३०१, जिंदाल रेसिडेन्सी, पनवेल | मे. जिंदाल बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स | बाळासाहेब मोकाशे |
| ४ | OP९९ | सी टी एस क्र. ५९७ ए/५९८ ए, ५९८/१ए ५९८ बी, ५९८/१ बी, केव्हीके केशर बाग, पनवेल. | मे.के.व्ही.के.होम्स | नताशा मनोहर पवार |
| ५ | OP९९ | प्लॉट क्र. ८, सदनिका क्र. १०२, ॲबोड सि.एच.एस.पनवेल. | ग्रील ॲबोड बिल्डर्स आणि डेव्हलपर्स, सोनल ओंकार सहस्त्रबुध्दे, ओंकार सुरेश सहस्त्रबुध्दे | संजय दामू जगताप, अनुपमा संजय जगताप |
| ६ | OP९९ | फा.प्लॉट क्र. २८-बी, सदनिका क्र. ३०१, माधवी स्मृती सोसा, पनवेल. | मिनल मुकुंद म्हात्रे, संमती देणारे मे.श्री. सदगुरु बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स | मनोज हिराभाई पटेल |
| ७ | OP९९ | सर्व्हे क्र. ७४५, सदनिका क्र. बी-४०४ जिंदाल रेसिडेन्सी, पनवेल. | मे.जिंदाल बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स | रोहिणी प्रितीश पंडीत, प्रितीश प्रकाश पंडीत |
| ८ | OP९९ | सर्व्हे क्र. ७४५, सदनिका क्र. बी-२०२ जिंदाल रेसिडेन्सी, पनवेल. | मे. जिंदाल बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स | रुक्मिणी बाबू सानप, बाबू चंद्रकांत सानप |
| ९ | OP९९ | सर्व्हे क्र. ७४३,सदनिका क्र.३०४, अपटाउन अवेन्यू, पनवेल. | मे. सिमरन इंटरप्रायजेस | गजानन बाळकृष्ण सोनटक्के, शुभांगी गजानन सोनटक्के |
| १० | OP९९ | प्लॉट क्र. १११/१, १११/२, सदनिका क्र. ए-१०१, आराधना सोसा. पनवेल. | दिलीप दत्तात्रेय जाधव | पवन दिलीप जाधव |
| ११ | OP९९ | सी टी एस क्र. १३६७/ए१, सदनिका क्र. ए-३०१, उषा प्रभा सोसा, पनवेल. | उषा प्रभा सोसा | संजय रघुनाथ वऱ्हाडी, समृध्दी संजय वऱ्हाडी |
| १२ | OP९९ | सी टी एस क्र. १३६७/ए१, सदनिका क्र. ए-१०३, उषा प्रभा सोसा, पनवेल. | उषा प्रभा सोसा | सोहनलाल हिराराम चांदोरा, भंवरी सोहनलाल चांदोरा |
| १३ | OP९९ | फा.प्लॉट क्र. ५६, सदनिका क्र. बी-३०५, योगेश्वर कृपा सोसा, पनवेल. | किशोर करसनदास पाबरी | देवेंद्र राजाराम केळकर |
| १४ | OP९९ | प्लॉट क्र. १११/१, १११/२, सदनिका क्र. बी-२०३, आराधना सोसा, पनवेल. | बानी सिंह | बानी सिंह मयत यांचे तर्फे वारस सरोज सिंह वाईफ ऑफ बानी सिंह |
| १५ | OP९९ | सी टी एस क्र. १५७९, गाळा क्र. ३, आब्बास हाऊस, पनवेल. | मे. राजहंस इन्टरप्रायजेस तर्फे भागीदार हसन अब्दुल्ला शेख स्वत करीता व भरागीदार रजनीस प्रताप पटेल, राजेश लक्ष्मण कांबळे संमती देणारे १) हनिफ हसनमियां ताडे २) नजमा हसनमियां ताडे ३) फयमिदा अनिस ताडे | रफिक हनसमियां ताडे |
| १६ | OP९९ | सी टी एस क्र. १५७९, सदनिका क्र. २०१, आब्बास हाऊस, पनवेल. | मे. राजहंस इन्टरप्रायजेस तर्फे भागीदार हसन अब्दुल्ला शेख स्वत करीता व भरागीदार रजनीस प्रताप पटेल, राजेश लक्ष्मण कांबळे संमती देणारे १) हनिफ हसनमियां ताडे २) नजमा हसनमियां ताडे ३) फयमिदा अनिस ताडे | रफिक हनसमियां ताडे |
| १७ | OP९९ | सर्व्हे क्र. ७४३,सदनिका क्र.७०१, अपटाउन अवेन्यू, पनवेल. | मे. सिमरन इंटरप्रायजेस | संध्याराणी धनेश भांदुर्गे |
| १८ | OP९९ | सर्व्हे क्र. ४७९ ए/१, सदनिका क्र. २०३, साई सिध्दी रेसिडेन्सी, पनवेल. | मे. सिध्दी इंटरप्रायजेस | श्रृती निखिल फाटक, निखिल नरहरी फाटक |
| १९ | OP९९ | सी टी एस क्र. १५७९, १५८०, १५८१, सदनिका क्र. १०४, अब्बास हाउस, पनवेल. | हनिफ हसनमियां ताडे | गुलाम मस्तफा, नसिबुन निसा |
| २० | OP९९ | फा. प्लॉट क्र. ११९, सदनिका क्र. सी- १०३, हरी ओम नगर सोसा, पनवेल | हरी ओम नगर को. ऑप.हौ. सोसा, मे. वास्तू इन्फ्रा बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स | शिम्पा आर चौधरी |
| २१ | OP९९ | सी टी एस क्र. १३६७/अे, सदनिका क्र. अे-२०३, उषा प्रभा सोसा, पनवेल. | उषा प्रभा सोसा | चंद्रकांत जी. तांबोळी |
| २२ | OP९९ | फा.प्लॉट क्र. ५०/२, सदनिका क्र. २०३, रतन विला, पनवेल. | मे. तुलसी कंसट्रक्शन कंपनी, रसिलाबेन एच.रंगपरीया व इतर | रोहिणी राजीव जोशी |
| २३ | OP९९ | सी टी एस क्र. १५७९ सदनिका क्र. ३०४, अब्बास हाउस,पनवेल. | नजमा हसनमियां ताडे | जुनेद रफिक ताडे |
| २४ | OP९९ | सी टी एस क्र. १५७९ सदनिका क्र. २०४, अब्बास हाउस, पनवेल. | रफिक हसनमियां ताडे | जुनेद रफिक ताडे |
| २५ | OP९९ | सी टी एस. क्र. १५७९ सदनिका क्र. २०३, अब्बास हाउस, पनवेल. | रफिक हसनमियां ताडे | वसीम रफिक ताडे |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधिन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरीलप्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
**सहा. आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# टीम इंडियाला धक्का

## न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिकेतून राहुल ‘आऊट’

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या कसोटी मालिकेपूर्वी भारतीय क्रिकेट संघाला एक धक्का बसला असून स्टार फलंदाज लोकेश राहुल हा दुखापतीमुळे मालिकेबाहेर झाला. त्याच्या जागी मुंबईकर फलंदाज सूर्यकुमार यादवला संघात बदली खेळाडू म्हणून समाविष्ट करण्यात आल्याची माहिती भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) ट्विट करून दिली.



भारतीय संघाने न्यूझीलंड विरूद्धची टी-२० मालिका ३-०ने जिंकली. पहिल्या दोन सामन्यांत आव्हानाचा पाठलाग करताना, तर तिसऱ्या सामन्यात आव्हानाचा बचाव करताना टीम इंडियाने मालिकेत बाजी मारली. आता न्यूझीलंडविरूद्ध भारतीय संघ दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. यातील पहिला सामना २५ ते २९ नोव्हेंबर आणि दुसरा सामना ३ ते ७ डिसेंबरदरम्यान खेळवला जाणार आहे. संपूर्ण कसोटी मालिकेसाठी रोहित शर्माला आणि पहिल्या सामन्यासाठी विराट कोहलीला विश्रांती देण्यात आली आहे. तशातच आता लोकेश राहुलही दुखापतीमुळे मालिकेबाहेर झाल्याने टीम इंडियासाठी हा मोठा धक्काच मानला जात आहे.

### सूर्यकुमार यादवला संधी

*भारताचा धडाकेबाज खेळाडू लोकेश राहुल याच्या डाव्या मांडीचे स्नायू दुखावले गेले. त्यामुळे त्याला आगामी भारत-न्यूझीलंड कसोटी मालिकेतून माघार घ्यावी लागली. आता तो दक्षिण आफ्रिका दौऱ्याआधी राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत जाऊन योग्य उपचार आणि सराव करेल आणि त्यानंतरच आगामी दौऱ्यासाठी निवडीला पात्र ठरेल. त्याच्या जागी सूर्यकुमार यादवला संधी देण्यात आली आहे.*

***संघ :** अजिंक्य रहाणे (कर्णधार), मयंक अग्रवाल, चेतेश्वर पुजारा (उपकर्णधार), शुभमन गिल, श्रेयस अय्यर, सूर्यकुमार यादव, ऋद्धिमान साहा (यष्टीरक्षक), केएस भरत (यष्टीरक्षक), रवींद्र जाडेजा, रविचंद्रन अश्विन, अक्षर पटेल, जयंत यादव, इशांत शर्मा, उमेश यादव, मोहम्मद सिराज, प्रसिध कृष्णा.*

# बास्केटबॉल निवड चाचणी स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगडच्या वतीने १८ वर्षाखालील मुलांच्या जिल्हा निवड चाचणीचे आयोजन रविवारी (दि. २८) सकाळी ७.३० वा. खांदा कॉलनीतील महात्मा स्कूल मैदानात करण्यात आले आहे.

या निवड चाचणीतून निवडलेला संघ १२ ते १५ डिसेंबर रोजी औरंगाबाद येथे होत असलेल्या १८ वर्षाखालील मुलांच्या राज्यस्तरीय स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करेल. निवड चाचणी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी आपले दोन पासपोर्ट साईज फोटो, वयाचा पुरावा आणि रहिवासी पुरावा सोबत घेऊन यावे. उशिरा आलेल्या खेळाडूंना प्रवेश मिळणार नाही. १८ वर्षाखालील सर्व बास्केटबॉलपटूंनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष तथा नगरसेवक विक्रांत पाटील यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सचिव नईम चिकटे (९७७३९१३४३४), विवेक गोरे (८१६९६५७९१९), आशिष पाटणे (९०२९५९६८८०), आकाश चाकणे (९०२९५९६९४९) यांच्याशी संपर्क साधावा.

# आरोग्य प्रहर

## हिवाळ्यात ‘या’ पदार्थांचे सेवन आरोग्यासाठी फायदेशीर

तंदुरुस्तीसाठी हिवाळा हा सर्वोत्तम ऋतू आहे. हिवाळ्यात हिरव्या भाज्या, सॅलड, फळे भरपूर असतात. बाजारात विविध प्रकारच्या भाज्या मिळतात. अशा परिस्थितीत तुम्ही तुमचा आहार आणि आहाराचे नियोजन करावे. दुसरीकडे हिवाळ्यात थंडीपासून वाचण्यासाठी तुम्ही अशा काही गोष्टींना तुमच्या आहाराचा भाग बनवा जेणेकरून शरीर उबदार राहील. तुम्ही आजींना हिवाळ्यात गूळ आणि तीळ खाण्यास सांगताना ऐकले असेल.



वास्तविक या दोन्ही गोष्टी थंडीपासून आराम देतात. हिवाळ्यात अशा अनेक गोष्टी असतात ज्या शरीरात ऊर्जा आणि उष्णता आणतात. या पाच गोष्टींचा आहारात जरूर समावेश करा.

**खजूर** – हिवाळ्यात खजूर अवश्य सेवन करा. खजूरमध्ये व्हिटॅमिन ए आणि बी मुबलक प्रमाणात आढळते. खजूर हे उष्ण असल्याने थंडीत आराम मिळतो. यामुळे आपले शरीर आतून उबदार राहते. खजूरमध्ये फॉस्फरस, पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि फायबरदेखील चांगले असते.

**गूळ** – हिवाळ्यातही गूळ जरूर खावा. पोट आणि शरीरासाठी गूळ खूप फायदेशीर आहे. गूळ खाल्ल्याने मेटाबॉलिज्म चांगले राहते. पचनासाठीही गूळ खूप फायदेशीर आहे. गुळामध्ये लोह असते, ज्यामुळे ॲनिमियासारख्या समस्या कमी होतात. हिवाळ्यात गुळामुळे शरीराला ऊब मिळते.

**तीळ** – हिवाळ्यात शरीर उबदार ठेवण्यासाठी तिळाचेही सेवन करावे. तीळ पांढरे आणि काळे दोन्ही असतात. तिळाचा प्रभाव उष्ण असतो, त्यामुळे थंडीत तीळ खाणे फायदेशीर ठरते. तिळात मोनो-सॅच्युरेटेड फॅटी ॲसिड आणि ॲंटी-बॅक्टेरियल खनिजे आढळतात. त्यामुळे शरीराला अनेक फायदे मिळतात.

**गाजर** – हिवाळा येताच बाजारात लाल-लाल गाजर उपलब्ध होतात. हृदय, मेंदू, मज्जातंतू आणि एकूणच आरोग्यासाठीही गाजर फायदेशीर आहे. गाजरात व्हिटॅमिन ए, बी, सी, डी, ई, जी आणि के आढळते. गाजरात भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन ए असते जे डोळ्यांसाठी खूप फायदेशीर असते.

**शेंगदाणे** – हिवाळ्यात शेंगदाणे खाणे आवश्यक आहे. प्रथिने आणि हेल्दी फॅटसोबतच अनेक जीवनसत्त्वे आणि खनिजेही त्यात आढळतात. शेंगदाण्यामध्ये मॅंगनीज, व्हिटॅमिन ई, फॉस्फरस आणि मॅग्नेशियम असते. शेंगदाणे खाल्ल्याने कोलेस्ट्रॉलही नियंत्रित राहते.

# ट्वेन्टी-२० मालिकेतील निर्भेळ यशात गोलंदाजीचे योगदान महत्त्वाचे -रोहित

**कोलकाता : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेतील ३-० अशा निर्भेळ यशात गोलंदाजीचे योगदान महत्त्वाचे होते, असे भारताचा नवनिर्वाचित कर्णधार रोहित शर्माने म्हटले आहे. ट्वेन्टी-२० सामन्यातील मधल्या षटकांत संघाला बळींची नितांत आवश्यकता असते तेव्हा रविचंद्रन अश्विन हा नेहमीच कर्णधाराचा हुकमी पर्याय असतो, अशा शब्दांत कर्णधार रोहितने त्याची प्रशंसा केली.

ईडन गार्डन्सवर भारताने तिसऱ्या सामन्यात न्यूझीलंडवर ७३ धावांनी विजय मिळवला आणि तीन सामन्यांच्या मालिकेवर कब्जा केला. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत रोहित म्हणाला, दुबईतील




### अश्विनचे खास कौतुक

पुनरागमनापासून ते आतापर्यंतचा अश्विनचा खेळ हा प्रभावी ठरला आहे. तो एक दर्जेदार गोलंदाज असल्याचे सर्वश्रुतच आहे. गेली अनेक वर्षे कसोटी क्रिकेटमध्ये त्याने हे सिद्ध केले आहेच, परंतु मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्येही त्याची कामगिरी फारशी वाईट नाही.

ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये मधल्या षटकांतील डाव महत्त्वाचा असतो. अश्विनसारखा गोलंदाज संघात असतो, तेव्हा तो महत्त्वाच्या फलंदाजांचे अडसर दूर करतो, अशा शब्दांत रोहितने त्याची उपयुक्तता अधोरेखित केली. रोहितने अक्षर पटेलच्या गोलंदाजीचेही कौतुक केले.

आम्ही संघात निरोगी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. खेळाडू निडरपणे मैदानावर खेळू शकतील यासाठी त्यांना बळ देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत, असे रोहितने राहुल द्रविड यांच्या मार्गदर्शनाखालील बदलाचे विश्लेषण करताना सांगितले.



# ‘यलो ब्रिगेड’ जोमात

## तमीळनाडूच्या विजयानंतर अनोखी हॅट्ट्रिक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

येथील स्टेडियमवर रंगलेल्या सैयद मुश्ताक अली स्पर्धेच्या अंतिम सामन्यात तमीळनाडूने विक्रमी विजेतेपद मिळवले. अखेरच्या चेंडूवर तमीळनाडूला ५ धावांची आवश्यकता असताना प्रतिक जैनच्या चेंडूवर शाहरूख खानने उत्तुंग षटकार लगावत संघासाठी विजयश्री खेचून आणली. तमीळनाडूच्या विजयामुळे एक अजब असा योगायोग पाहायला मिळाला.

क्रिकेटच्या क्षेत्रात यंदा काही मोजक्या मोठ्या स्पर्धा झाल्या. सर्वांत आधी आयपीएल रंगली. या स्पर्धेत चेन्नईच्या संघाने विजेतेपद मिळवले. त्यानंतर टी-२० विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाच्या संघाने दमदार खेळ करीत विश्वविजेतेपद मिळवले. सोमवारी भारताच्या देशांतर्गत स्पर्धा असलेल्या सैयद मुश्ताक अली स्पर्धेच्या अंतिम फेरीत तमीळनाडूच्या संघाने बाजी मारली. योगायोगाची बाब म्हणजे या तिन्ही विजेत्या संघांची जर्सी ही पिळव्या रंगाची होती.



पनवेल : येथील महापालिकेला स्वच्छताविषयक पुरस्कार मिळाल्याबद्दल वाटचालीत सहकार्य करणारे आयुक्त गणेश देशमुख यांचे सत्ताधारी भाजपच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, नगरसेवक मनोज भुजबळ, मुकीद काझी, प्रभाग समिती अध्यक्ष सुशीला घरत, नगरसेविका वृषाली वाघमारे आदी उपस्थित होते.

# ‘भारत श्री’ विजू पेणकरांच्या चरित्राचे २९ नोव्हेंबरला प्रकाशन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे पहिले ‘भारत श्री’ विजेते शरीरसौष्ठवपटू आणि राष्ट्रीय विजेते कबड्डीपटू विजू पेणकर यांच्या खेळचरित्राचे प्रकाशन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी हॉकीस्टार धनराज पिल्ले आणि व्यायामहर्षी मधुकर तळवलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. येत्या सोमवारी २९ नोव्हेंबरला सायंकाळी ६ वाजता या प्रकाशन सोहळ्याचे माझगाव येथील सर एली कदुरी शालेच्या प्रांगणात आयोजन करण्यात आले आहे.

सदामंगल पब्लिकेशनने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. डोंगरी-उमरखाडीच्या मातीत कबड्डीचे हुंकार घुमवत असतानाचा शरीरसौष्ठव खेळातही विजू पेणकर यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. कबड्डीसोबतच १९७२ साली बॉडीबिल्डिंगमधील सर्वोच्च असा भारत श्री किताबही विजू पेणकर यांनी पटकाविला होता.





पनवेल : भाजपचे कळंबोली शहर चिटणीस संतोष मानसिंग गायकवाड यांच्या सौजन्याने देण्यात येत असलेल्या टी-शर्ट्सचे अनावरण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. गायकवाड यांनी या टी-शर्ट्सचे युवावर्गात वाटप केले आहे.












पनवेल : भाजपचे तालुका अध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष, अजातशत्रू व्यक्तिमत्त्व अरुणशेठ भगत यांचे वाढदिवसानिमित्त पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतकांनी अभीष्टचिंतन केले.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com